नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २४३ * * अकोला * | बुधवार, दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

आज महाशिवरात्री

सर्व भाविकांना हार्दिक शुभेच्छा



## विधानसभेतून आपचे २१ आमदार निलंबित

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५ :**
मंगळवारी दिल्ली विधानसभेच्या दुसऱ्या दिवशी, दारू धोरणावरील कॅगचा अहवाल सभागृहात सादर करण्यात आला. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी हा अहवाल सभागृहात सादर केला. एलजी व्हीके सक्सेना म्हणाले की, मागील सरकारने हा अहवाल होल्डवर ठेवला होता. ते सभागृहात मांडण्यात आले नाही. त्यांनी उघडपणे संविधानाचे उल्लंघन केले.

मुख्यमंत्री भवनात भगतसिंग आणि आंबेडकरांच्या छायाचित्रांच्या मुद्द्यावरून विरोधी पक्ष 'आप'ने सभागृहात गोंधळ घातला. नायब राज्यपाल व्ही.के. सक्सेना भाषण देत असताना आपच्या आमदारांनी घोषणाबाजी केली. यानंतर, विरोधी पक्षनेत्या आतिशींसह २१ आप आमदारांना निलंबित करण्यात आले.



अग्राग्रलेख

## खरीखरी..

# सोमय्या गप्प का ?

सातत्याने अखंड पोलखोल करणारे, प्रचंड खोलात जाऊन शोध घेणारे भारतीय जनता पक्षाचे मा. खासदार किरीट सोमय्या यांच्यासाठी अनेक महिन्यांपासून कितीतरी खासदारे बंद झालेली आहेत. किरीट सोमय्या यांची किरीटगिरी ऐकायची सवय झालेल्या महाराष्ट्रातील आणि विशेषता त्यांच्या मुंबईतील कित्येक किरीट प्रेमींसाठी सध्या दुःख सागरात बुडण्यासारखी गोष्ट आहे. सोमय्या यांची लीला अपरंपार आहे. त्यांचे प्रताप कोणाला माहित नाहीत. गंमत अशी आहे की, या किरीट भाऊंनी ज्यांच्या ज्यांच्यावर अनंत आरोप केले. त्यापैकी बहुतेक जण भारतीय जनता पक्षाच्या वॉशिंग मशीन मध्ये आल्याबरोबर शुभ्र धवलांकित झालेले आहेत. दोन-चार नावे जरी आपण आठवली. तरी किरीट दादांच्या आरोपानंतर तेरी भी चूप आणि मेरी भी चूप, असा प्रकार उघडपणे सुरू आहे. वाशिमच्या अत्यंत लोकप्रिय खासदार भावना गवळी यांच्या भावना दुखावण्यासाठी सर्व किरीट प्रेमींचे लाडके किरीट भाऊ अनेक वेळा वाशिमला गेले. त्यांनी भावनाताई? यांच्यावर उघड उघड अनेक आरोप केले. पण आता भावनाताई तिकडून इकडे आलेल्या आहेत आणि त्यांच्यावरील बालंट दूर झालेले आहे. शिवसेनेचे आणि किरीट भाऊंचे सख्खे वैर आहे. भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना हे दोन्ही पक्ष जेव्हा एकसाथ होते. तेव्हाही किरीट सोमय्या अय्या-अय्या, इश्श-इश्श न करता शिवसेनेवर आपल्या भात्यातून जहरी बाण फेकतच होते. मात्र आता महाराष्ट्राला आणि विशेष करून मुंबईला किरीट सोमय्या यांच्या मौनामुळे कसेसेच वाटत आहे. आमचे एक मित्र आज आम्हाला म्हणाले की, आपले किरीटभाऊ सध्या बोलत नसल्यामुळे मला तरी कसेसेच वाटते. 'दिले सर्व काही, तरीही बोलत का नाही' असा प्रश्न आमच्या त्या मित्रास पडलेला आहे. मध्यंतरी किरीट भाऊ आपल्या पक्षावर नाराज होते. पक्षाने त्यांना दिलेले वजनदार पद त्यांनी नाकारले. त्यापूर्वी त्यांच्यावर सोदाहरण बरेच आरोप करण्यात आले होते. त्याचा उल्लेख इथे करण्याची गरज नाही. कारण ते सर्वज्ञात आहेत. आरोप खरे किंवा खोटे असो. आरोप हे आरोपच असतात. आरोपाचे वारंवार उच्चारण केले तर कधी आरोपी फसतात. तर कधी कधी आरोप करणारेही फसतात. किरीट सोमय्या यांच्या प्रकरणात आरोपांमुळे कोण कोण फसले आणि कोण कोण हसले. हे ज्याअर्थी जाहीर झालेले नाही. त्याअर्थी भविष्यातही तसे काही होण्याची शक्यता नाही. अशा परिस्थितीत किरीट भाऊंना मौन पाळावे असे वाटत असेल. कारण मौनम् सर्वार्थ साधनम् म्हणजेच आपण बेंबीच्या देठापासून ओरडून ओरडून आरोप करावेत आणि आपल्या बड्या बड्या पुढाऱ्यांनी आरोपांकडे लक्ष न देता समारोप करावा. आता हे असे आणखी किती काळ खपवून घ्यायचे. किरीट सोमय्या यांच्यासारख्या नीतिमान आणि सत्शील माणसाला यामुळे किती किती वेदना, त्यांच्या काळजाला किती किती यातना होत असतील. हे किरीट सोमय्या यांच्या कुटुंबीयांनाच विचारले पाहिजे. इतक्या लोकांवर केलेल्या आरोपांची जंत्री यांच्या डायरीत असेलच. ज्यांच्यावर आरोप केले. ते तोऱ्यात मिरवत आहेत आणि आपल्या किरीटजींच्या आरोपाची कागदपत्रे संडासांच्या मोऱ्यात वाहून जात आहेत. अशा प्रकारे आपल्या आरोपांचा बोऱ्या वाजल्यावर कोणालाही निराशा येऊ शकते. पण किरीट सोमय्या यांच्या चेहऱ्यावरचे तेज अजूनही कायम आहे. म्हणजेच त्यांना निराशा आलेली नाही. खरे तर सोमय्या यांच्यासारख्या राजकारणातील सत्पुरुषाला त्यांच्या पक्षाने त्यांना शोभेल अशी कामगिरी द्यावी. अशी आमची खास विनंती आहे. ते माजी खासदार असल्याने महाराष्ट्रातील अनेक माजी लोकांना त्यांनी आपल्या शिंगावर घेतले. कारण त्यांना खास अधिकार होते, असे त्यांचे म्हणणे आहे. किरीट सोमय्या यांच्या एकूण खोदून खोदून काढलेल्या प्रकरणांच्या बाबत त्यांच्या पक्षाने एक काळी पत्रिका काढावी काढली पाहिजे. (कारण त्याला श्वेतपत्रिका म्हणणे योग्य होणार नाही.) तसेच किरीट भाऊंच्या शौर्याबद्दल त्यांच्या गुणांची कदर केली पाहिजे. स्वयंघोषित, अनीती निर्दालक, नीती पालक, नित्य जनता सेवक आणि एकेकाळच्या सर्व दूरचित्रवाणी वाहिनी चालक असलेल्या किरीट सोमय्या यांची आठवण मुंबईकर व महाराष्ट्राच्या मनात ताजी राहावी, म्हणून आम्ही हा सारा खटाटोप केलेला आहे. यानिमित्ताने तरी किरीट दादांचे स्मरण झाले. हा आमच्यासाठी मनोरंजक सुयोग आहे. सोमय्या गप्प का? या प्रश्नाचे उत्तर आमच्या वरील विवेचनात आलेले आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# विधिमंडळ समित्या जाहीर

**सार्वजनिक उपक्रम समितीच्या अध्यक्षपदी राहुल कुल ■ संतोष दानवे : पंचायत राज समिती ■ रवी राणा : आश्वासन समिती**

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २५ :**
महाराष्ट्र मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली असून अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

यात महाराष्ट्र विधिमंडळाच्या २०२४-२५ या कार्यकाळासाठी विविध समित्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समित्यांची नियुक्ती मुख्यमंत्री फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि भाजप विधिमंडळ मुख्य प्रतोद रणधीर सावरकर यांच्या संमतीने करण्यात आली आहे.

मंत्रिमंडळात झालेल्या निर्णयानुसार, सार्वजनिक उपक्रम समितीच्या अध्यक्षपदावर पुण्यातील दौंड मतदारसंघाचे भाजपचे नेते राहुल कुल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पंचायत राज समितीच्या अध्यक्षपदावर रावसाहेब दानवे यांचे पुत्र संतोष दानवे यांची वर्णी लागली आहे. आश्वासन समितीच्या अध्यक्ष पदावर रवी राणा यांची, तर अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अध्यक्ष पदी नारायण कुचे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अनुसूचित जमाती कल्याण समितीवर राजेश पाडवी, तर महिला हक्क व कल्याण समितीवर मोनिका राजळे या अध्यक्ष राहतील. इतर मागासवर्गीय कल्याण समितीवर किसन कथोरे, मराठी भाषा समिती पदावर अतुल भातखळकर, विशेष हक्क समितीवर राम कदम, धर्मादाय खाजगी रुग्णालय तपास समितीवर श्रीमती नमिता मुंदडा, आणि आमदार निवास व्यवस्था समितीच्या अध्यक्ष पदावर सचिन कल्याणशेट्टी हे अध्यक्ष म्हणून कारभार पाहणार आहे.

दरम्यान, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या कोट्यातील समित्यांचे वाटप अद्याप झाले नाही. विधानसभा अध्यक्षांनी विविध समित्यांच्या संदर्भात नव्या नियुक्त्या सर्व पक्षीयांकडून होत नसल्याने नाराजी व्यक्त केली होती. तर मंत्रिपद हुकलेल्या भाजप आमदारांचे समितीच्या मार्फत राजकीय पुनर्वसन केले जाणार आहे.

तसेच या समित्यांचे वाटप महायुतीच्या फॉर्म्युल्यानुसार होणार असल्याचे बोलले जात आहे. विधिमंडळाच्या एकूण २९ समित्या असतात, त्यातील भाजपच्या वाट्याला ११ समित्या आल्या असून, शिंदे व अजित पवार गटाला काही समित्या मिळतील.



## मंत्रालयाच्या चौथ्या मजल्यावरून तरुणाची उडी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :**
मंत्रालयात एका तरुणाने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असल्याची घटना घडली. मंत्रालयाच्या चौथ्या मजल्यावरून या तरुणाने उडी मारली. सुदैवाने सुरक्षा जाळीत अडकल्याने मोठा अनर्थ टळला असून या तरुणाचा जीव वाचला आहे. या वेळी पोलिसांनी जाळीवर जात तरुणाला धरून सुखरूप बाहेर काढले असल्याचे दिसते.

या तरुणाचे मंत्रालयातील महसूल विभागात काम होते. जागेच्या संदर्भात आपल्याला न्याय मिळत नसल्याचा आरोप या तरुणाने केला आहे. मात्र आपले काम होत नसल्याचे लक्षात आल्यावर इंकलाब जिंदाबादच्या घोषणा देत मंत्रालयातील चौथ्या मजल्यावरून त्याने थेट उडी मारली. मात्र जाळीवर अडकल्याने त्याचा जीव वाचला असून त्याला पोलिसांनी तातडीने मदत करत सुखरूप बाहेर काढले. या तरुणाचे अद्याप नाव समजू शकले नाही.

दरम्यान, पोलिसांनी पत्रकारांना या तरुणाशी संवाद साधण्यापासून देखील रोखल्याचे समोर आले आहे. यावर संतप्त पत्रकारांनी मंत्रालय पोलिस उपायुक्त कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन केले आहे. जनतेचे प्रश्न आम्ही मांडत असतो मात्र आम्हाला धक्काबुक्की केली जाते, असा आरोप यावेळी संतप्त पत्रकारांनी केला आहे. तसेच पोलिस माफी मागत नाहीत तोपर्यंत आंदोलन करणार. यावेळी पत्रकारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आपली व्यथा सांगीतली.

# महागाई भत्त्यात 3 टक्कयांची वाढ

### राज्य सरकारचा मोठा निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :**
महाराष्ट्र सरकारने राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी महागाई भत्त्यामध्ये ३ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांसाठी ही एक खुशखबरच मानली जात आहे. यानुसार महागाई भत्त्याचा दर ५० टक्क्यांवरून ५३ टक्के करण्यात आला आहे.

महाराष्ट्र सरकारच्या वित्त विभागाने २५ फेब्रुवारी रोजी एक शासन निर्णय जारी केला असून, या निर्णयानुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात १ जुलै २०२४ पासून सुधारण करण्यात आली आहे. या सुधारणेनुसार महागाई भत्त्याचा दर ५० टक्क्यांवरून ५३ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे. हा वाढीव महागाई भत्ता १ जुलै २०२४ पासून लागू करण्यात आला आहे.

राज्य शासनाच्या या निर्णयानुसार हा वाढीव महागाई भत्ता फेब्रुवारी महिन्याच्या वेतनात दिला जाणार आहे. अर्थात १ जुलै २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ या सात महिन्यांचा वाढीव महागाई भत्ता फेब्रुवारी २०२५ च्या वेतनात थकबाकी म्हणून दिला जाणार आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या या मागणीला अखेर यश आले असल्याचे दिसत आहे. सध्याची महागाई पाहता सरकारने हा निर्णय घेतला असल्याचे बोलले जात आहे. शासनाच्या या निर्णयावर सरकारी कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

दरम्यान, केंद्र सरकारच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा राज्यातील एकूण १७ लाख शासकीय कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीची सुरुवात करण्यात आली असून फेब्रुवारीच्या वेतनात कर्मचाऱ्यांना वाढीव पगार देण्यात येणार आहे.

**किती थकबाकी मिळणार?**

एखाद्या कर्मचाऱ्याचा ४० हजार रुपये मूळ पगार असेल तर ३ टक्के वाढीव भत्त्यासह दरमहा १२०० रुपये अतिरिक्त महागाई भत्ता मिळण्यास सुरुवात होईल. ही वाढ जुलैपासूनच लागू मानली जात असल्याने कर्मचाऱ्यांना जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांची थकबाकीही दिली जाणार आहे. अशाप्रकारे त्यांना थकबाकी म्हणून ३६०० रुपयेही मिळतील.

## सज्जन कुमारला जन्मठेप



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५ :**
दिल्लीतील १९८४ च्या शीख विरोधी दंगली प्रकरणात मंगळवारी कॉंग्रेसचे माजी खासदार सज्जन कुमार यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. राऊस अव्हेन्यू न्यायालयाच्या विशेष न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी दुपारी २ नंतर निकाल दिला.

न्यायालयाने २१ फेब्रुवारी रोजी शिक्षेवरील निर्णय राखून ठेवला होता. पीडितेच्या बाजूने सज्जन कुमारला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली होती. १२ फेब्रुवारी रोजी सज्जन कुमारला दोषी ठरवण्यात आले. हे प्रकरण दंगलीच्या वेळी सरस्वती विहारमध्ये जसवंत सिंग आणि त्यांचा मुलगा तरुणदीप सिंग यांच्या हत्येशी संबंधित आहे. या काळात सज्जन हे बाह्य दिल्ली लोकसभा मतदारसंघातून कॉंग्रेसचे खासदार होते. ते सध्या दंगलीच्या दुसऱ्या एका प्रकरणात तिहार तुरुंगात आहे आणि जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. सज्जन कुमारविरुद्ध दंगल, खून आणि दरोडा या आरोपाखाली अनेक कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. आज त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली.

## शशी थरूर यांचेकडून काँग्रेस सोडण्याचे संकेत

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५ :**
काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्यासोबतचा एक फोटो इंस्टाग्रामवर शेअर केला आहे.

शशी आणि काँग्रेस पक्षातील संबंधांमध्ये कटुता येत असल्याच्या बातम्या येत असताना त्यांची ही पोस्ट आली आहे. शशी थरूर यांनी यापूर्वी ते काँग्रेसमध्ये नाराज असल्याचे म्हटले आहे. पक्षात आपले काम नसल्यास आपल्यापुढे पर्याय उपलब्ध असल्याचे ते म्हणाले होते. आता हा फोटो शेअर करीत पक्ष सोडण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.



## शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काँग्रेस रान पेटवणार

**अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्यभर आंदोलन**

■ **महासागर प्रतिनिधी,मुंबई, दि.२५ :**
भाजपाच्या राज्यात शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट असून शेतमालाला हमीभाव मिळत नाही. निवडणुकीच्या काळात भाजपा युतीने शेतकऱ्यांचे कर्जमाफ करण्याची घोषणा केली परंतु अद्याप त्यावर निर्णय घेतला नाही. त्यामुळे काँग्रेस शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ३ मार्च रोजी राज्यभर आंदोलन करणार आहे. तसेच महापालिका क्षेत्रातील विकास कामे व जनतेची कामे ठप्प पडली आहेत, त्याविरोधात ४ मार्चला महापालिका क्षेत्रात आंदोलन केले जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली.



टिळक भवन येथे आज प्रदेश काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. ८ व ९ मार्च रोजी बीड जिल्ह्यात सद्भावना पदयात्रा काढण्यात येत आहे, त्यासंदर्भात तसेच पक्ष संघटना बळकट करण्यावरही बैठकीत चर्चा करण्यात आली. या बैठकीला सहप्रभारी बी. एम. संदीप, कुणाल चौधरी, नसीम खान, प्रदेश उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांच्यासह प्रदेश पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काँग्रेसच्यावतिने करावयाच्या आंदोलनाची माहिती दिली.

## जयंत पाटील, बावनकुळेंची मध्यरात्री भेट अन् चर्चा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि.२५ :**
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सोमवारी मध्यरात्री भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतल्याची बातमी समोर आली आहे. या भेटीमुळे जयंत पाटील हे भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

तथापि, यासंदर्भात जयंत पाटील यांनी भाजपात जाणार असल्याची शक्यता फेटाळली आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक

## सुनावणी पुढे ढकलली

**चार वर्षांपासून रखडल्या निवडणुका**

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि.२५ :**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबत सुप्रीम कोर्टातील सुनावणी आजही होऊ शकली नाही. आज हे प्रकरण २९ व्या क्रमांकावर होते, पण कोर्ट क्रमांक ३ मध्ये आज दुपारी एक वाजेपर्यंतच कामकाज होणार होते. ८ व्या क्रमांकापर्यंतची प्रकरणे कोर्टाने ऐकली.

त्यानंतर कामकाज संपताना याचिकाकर्त्यांचे वकील आणि सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी ४ मार्च ही तारीख मागितली. कोर्टाने त्यावर विचार करू असे म्हटले. आता पावसाळ्याआधी एप्रिल आणि मे महिन्याची डेडलाईन जवळ येत असताना ४ मार्चला तरी काही ठोस होते का? यावर निवडणुकांचे भवितव्य अवलंबून आहे.

विधानसभा निवडणुकीनंतर सर्वच राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. तशी मोचेबांधणी विविध पक्षांकडून सुरु झाली आहे. मात्र मात्र प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे त्यांना आणखी वाट पाहावी लागणार आहे. २५ जानेवारी २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणी सुनावणी झाली होती. मात्र त्यावेळीही सुनावणी पुढे ढकलत २५ फेब्रुवारी तारीख देण्यात आली. त्यानंतर आजही सुप्रीम कोर्टात यावर सुनावणी झाली नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी आरक्षणाचा मुद्दा रखडल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. या याचिकेच्या माध्यमातून निवडणुका घेण्यासंदर्भात विनंती न्यायालयाकडे करण्यात आली. तर ओबीसी आरक्षण असो किंवा नसो मात्र निवडणुका व्हाव्यात, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी मागणी केली आहे. या प्रकरणात ओबीसी आरक्षणाचा मुद्दा प्रलंबित आहे. त्यामुळे राज्यातील महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचे भवितव्य अधांतरी आहे. निवडणुकीच्या वेळापत्रकावर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि त्यामध्ये ओबीसी आरक्षण हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

सर्वोच्च न्यायालयासमोर हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी चार- चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाही. देशात लोकसभा निवडणूक पार पडली. त्यापाठोपाठ राज्यातही विधानसभा निवडणूक झाली. त्यानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होतील, यावर सर्वत्र चर्चा सुरू आहे.

# आधारसामग्री डाटा धोरणास राज्य सरकारची मान्यता

**फडणवीस सरकारचे सात मोठे निर्णय**

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि.२५ :**
महाराष्ट्र राज्य आधारसामग्री डाटा धोरणास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यासाठी राज्य डाटा प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणार असून मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियामक समिती स्थापन करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयाला मान्यता देण्यात आली. याबरोबरच बीड जिल्ह्यातील परळी येथे नवीन पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास देखील मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

याच बरोबर 1976 पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवण्यासाठी प्रलंबित कामांचा कृती कार्यक्रम राबवण्याचा निर्णय; अशा 332 गावठाण साठी 599.75 कोटी रुपयांच्या तरतुदीस राज्य सरकारच्या वतीने मंत्रिमंडळाच्या वतीने मंजूरी देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या मंत्रिमंडळ बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.

पौड, ता. मुळशी, जिल्हा पुणे येथे लिंक कोर्टऐवजी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या न्यायालयाची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली. ठाणे जनता सहकारी बँकेत सार्वजनिक उपक्रम, महामंडळे यांना खाते उघडण्यासाठी परवानगी देण्यात आली असून, 1976 पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवण्यासाठी प्रलंबित कामांचा कृती कार्यक्रम राबविण्याचा निर्णय; अशा 332 गावठाणासाठी 599.75 कोटी रुपयांच्या तरतुदीस मंजूरी प्रदान करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य आधारसामग्री (डेटा) धोरणास मान्यता; राज्य डेटा प्राधिकरण स्थापन करणार. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियामक समिती नेमण्यास मान्यता देण्यात आली असून, बारामती जिल्हा पुणे येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी प्रदान करण्यात आली. परळी येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी देवून 564.58 कोटी रुपयांच्या तरतूदीस मंजूरी प्रदान करण्यात आली. महाराष्ट्र महामार्ग अधिनियम कलम 18(3) 1955 मध्ये सुधारणा करण्याचे आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत ठरविण्यात आले.

### तेलंगणातील बोगदा अपघात

# ७२ तासानंतरही हात रिकामेच

■ **वृत्तसंस्था हैद्राबाद दि. २५ :**
शनिवारी सकाळी तेलंगणातील नागरकुरनूल जिल्ह्यात एसएलबीसी (श्रीशैलम लेफ्ट बँक कॅनाल) बोगदा प्रकल्पाचा एक भाग कोसळला. ज्यामध्ये अनेक मजूर अडकले.

नागरकुरनूलमध्ये बांधल्या जाणाऱ्या जगातील सर्वात लांब ४२ किमी लांबीच्या पाण्याच्या बोगद्यात आठ कामगार अडकून पडून ७२ तासांहून अधिक काळ लोटला आहे. ५८४ जणांची टीम बचाव कार्यात गुंतली आहे.

यामध्ये आर्मी, नेव्ही, एनडीआरएफ, एसडीआरएफ, आयआयटी चेन्नई आणि एल अँड टी कंपनीचे तज्ज्ञ समाविष्ट आहेत. परंतु अद्यापपर्यंत अडकलेल्या कर्मचाऱ्यांशी कोणताही संपर्क झालेला नाही.





यानंतर, हे काम आता १२उंदीर खाण कामगारांना (उंदरांसारखे खाणी खोदणारे मजूर) देण्यात आले आहे. त्यांनीच २०२३ मध्ये उत्तराखंडमधील सिल्कयारा बोगद्यात अडकलेल्या ४१ कामगारांना सुखरूप वाचवले होते.

सोमवारी दुपारी ६ उंदीर खाण कामगारांची टीम आली आहे. उर्वरित ६ जणांची टीम बुधवारी पोहोचेल. सध्या ही टीम फक्त आत जाऊन परिस्थितीचा आढावा घेईल. एनडीआरएफ आणि एसडीआरएफसोबत रॅट मायनर्स टीमची बैठक झाल्यानंतर बचावकार्य सुरू होईल. पाण्यामुळे बचाव कार्यात जास्त वेळ लागू शकतो, असे अधिकारी सांगत आहेत.

# एसटीच्या जाहिरातीवर शासनाचे अतिक्रमण

## १४० जाहिरातींच्या जागा परस्पर केल्या हडप

### कर्मचारी संघटनेचे श्रीरंग बरगे यांचा आरोप



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई , दि. २५: एसटीच्या स्थानक व आगाराच्या आवारातील जाहिरातीच्या जागांवर शासनाच्या जाहिराती प्रसिद्ध करण्याची निविदा शासनाने परस्पर काढली असून बळजबरीने एसटीच्या १४० जागा हडप केल्याचा आरोप महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे.

एसटीच्या स्थानक परिसर व आवारात वर्षानुवर्षे विविध जाहिराती प्रसिध्द केल्या जात असून त्यांतून काही कोटींचे उत्पन्न महामंडळाला मिळत आहे.या जागा शासनाच्या जाहिरात विभागाने परस्पर हडप केल्या असून त्यावर बळजबरीने अतिक्रमण केले आहे. या जागांवर शासनाच्या जाहिराती प्रसिद्ध करण्यासाठीची निविदा काढण्यात आली असून प्रक्रियेची निविदा पूर्व बैठक म्हणजेच प्री बीड काल माहिती व तंत्रज्ञान संचानालयाने आयोजित केली होती. याला एसटी महामंडळाने पत्र लिहून आक्षेप घेतला असल्याचे समजत असून यापूर्वी पाच वर्षाच्या करारावर या जाहिरातीच्या जागा भाडे तत्वावर घेणाऱ्या कंपनीने आक्षेप घेतला आहे . करोडोंचे उत्पन्न देणाऱ्या एसटीच्या जाहिरातींच्या जागांवरील शासनाचे अतिक्रमण सहन केले जाणार नाही असेही बरगे यांनी म्हंटले आहे.

मोटर ट्रांस्पोर्ट कायदा १४५० नुसार महामंडळाची स्थापना झाली असून त्यावर राज्य शासनाचे व केंद्र शासनाचे समान अधिकार आहेत.धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी संचालक मंडळाची स्थापना करण्यात आलेली असून याच अधिनियमात महामंडळाला त्यांच्या जागांवर जाहीराती करून प्रवाशी उत्पन्नाशिवाय इतर उत्पन्न प्राप्त करून घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

राज्य शासनाला संचालक मंडळाच्या परवानगी शिवाय कोणत्याही जागा किंवा भूखंडा बाबतीतले अध्यादेश काढता येत नाहीत. तरीही राज्य शासनाने महामंडळाच्या बसस्थानक परिसरातील जाहिरातींच्या जागांवर नियम बाह्य पद्धतीने अतिक्रमण केले असून या जागा त्यांच्या मर्जीतील खाजगी कंत्राटदाराच्या घशात घालण्याचा डाव आखला असल्याचे दिसून येत आहे.नियम डावलून सुरू असलेली शासनाची ही दादागिरी खपवून घेतली जाणार नाही असेही बरगे यांनी म्हंटले आहे.

एसटी महामंडळाने बस स्थानकावरील होर्डिंगद्वारे जाहिरात प्रसिद्ध करण्यासाठी या पूर्वीच ६० कोटी रुपयांचे कंत्राट पाच वर्षे कालावधी करिता दिले असून दुसऱ्या एका खाजगी संस्थेला एल.सी. डी. व डिजिटल जाहिरात प्रसिद्ध करण्यासाठी १२ कोटी ५० लाख रुपयांचे कंत्राट देण्यात आले आहे. त्यातून महामंडळाला उत्पन्न मिळत असून शासनाला त्यांच्या जाहिराती प्रसिद्ध करायच्या असल्यास महामंडळाने नियुक्त केलेल्या अधिकृत परवानाधारकाद्वारे केंद्र शासनाने स्वीकृत केलेल्या सवलतीच्या किमान दरात एसटीच्या अधिकृत जाहिरात परवाना धारकाकडून जाहिराती प्रसिद्ध करता येतात व आज पर्यंत अशाच प्रकारे जाहिराती करण्यात आलेल्या आहेत.

मात्र शासनाच्या कोणत्याही विभागाला थेट बस स्थानकावर जाहिरात करण्याचे अधिकार नसताना नियम पायदळी तुडवून १४० जागा परस्पर हडप केल्याचेही काढलेल्या निविदेतून निर्दशनास आले असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या प्रकरणांत तातडीने लक्ष घालून निविदा प्रक्रिया स्थगित करण्यात यावी अशी मागणीही बरगे यांनी केली आहे.

# योगेश कदमांनी काढले 'मातोश्री'चे रेटकार्ड

### गिफ्ट देणाऱ्याला तिकीट ; नीलम गोऱ्हेंचे समर्थन



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई , दि. २५ : राज्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे यांची पाठराखण करत थेट मातोश्रीवरील रेटकार्ड बाहेर काढले आहे. मातोश्रीवर राबणाऱ्या कार्यकर्त्यांच्या जागी गिफ्ट देणाऱ्या कार्यकर्त्याला तिकिट दिले जात होते, असे ते म्हणालेत. उद्धव ठाकरे यांना एक-दोन मर्सिडीज भेट दिल्या की ते पद देतात, असा दावा विधान परिषदेच्या उपसभापती तथा शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी केला आहे. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ माजली असताना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी त्यांच्या या विधानाचे समर्थन केले आहे. ते यासंबंधी म्हणाले की, आमच्याकडे मातोश्रीविषयी अनेक पुरावे आहेत. लोकसभा, विधानसभा व पालिका निवडणुकांसाठी मातोश्रीचे वेगवेगळे रेटकार्ड आहेत.

### नीलम गोऱ्हेंचे तथ्य डावलता येणार नाही

ठाकरे गटात पक्षासाठी राबणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांच्या जागी गिफ्ट देणाऱ्या कार्यकर्त्याला तिकीट दिले जाते. यामुळे अनेकजण ठाकरेंना सोडून गेले. रामदास कदम, प्रताप सरनाईक, तानाजी सावंत यांच्यासारख्या शिवसेनेच्या ज्येष्ठ नेत्यांना कोणकोणत्या प्रकारचे गिफ्ट मागण्यात आले हे विचारले पाहिजे. कोण गिफ्ट देतो? कसे तिकीट मिळते? विधानसभेचे तिकीट हवे असेल तर त्याचे वेगळे रेटकार्ड आहे. या प्रकरणी नीलम गोऱ्हे यांनी सांगितलेले तथ्य डावलता येणार नाही. उद्धव ठाकरे यांची मागील १५ वर्षांपासून राजकारण करण्याची हीच पद्धत आहे. त्याला कंटाळूनच त्यांना अनेकजण सोडून गेले. आज एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात तिकीट देताना केवळ उमेदवार विजयी होणार की नाही? तो शिवसैनिक आहे की नाही? ही एकच गोष्ट पाहिली जाते, असे योगेश कदम म्हणाले.

भारतात राहून पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा देणाऱ्यांवर निश्चितच कारवाई होणार. तुम्हाला एवढा पाकिस्तानचा पुळका असेल तर खुशाल जा. भारतात असे प्रकार सहन केले जाणार नाहीत, असेही योगेश कदम यावेळी ठणकावत म्हणाले. नीलम गोऱ्हे यांनी ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात बोलताना उद्धव ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केले. कुठल्याही कार्यकर्त्याला कमी लेखण्याचे कारण नाही. २०१२ वगैरे पर्यंत मी पाहात आले आहे की, शिवाजी पार्क येथे होणाऱ्या सभा, मेळाव्यांना एकनाथ शिंदे यांचेच कार्यकर्ते गर्दी करायचे. दुसरा भाग असा की संपर्क नको असेल नेत्यांना तर तिथे आपण राहण्यात काही अर्थ नाही. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडिज गाड्या मिळाल्या की एक पद मिळते ही वस्तुस्थिती आहे. बाळासाहेब ठाकरे जोपर्यंत होते तोपर्यंत त्यांचे सगळीकडे लक्ष होते. नंतर अवनती होत गेली, असे त्या म्हणाल्या.

# भाजपचे माजी आमदार गणपत गायकवाड यांच्या मुलाचे नाव चार्जशीट मधून वगळले

### महेश गायकवाड गोळीबार प्रकरण

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई , दि. २५ : कल्याण पूर्वचे तत्कालीन आमदार गणपत गायकवाड यांनी उल्हासनगरच्या हिल लाईन पोलिस ठाण्यात शिंदे सेनेचे नेते महेश गायकवाड यांच्यावर केलेल्या गोळीबार प्रकरणात एक महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. या प्रकरणाच्या पुरवणी चार्जशीट मधून आमदार गणपत गायकवाड यांचा मुलगा वैभव गायकवाड याचे नाव वगळण्यात आले आहे. वैभव गायकवाड विरोधात कोणतेही ठोस पुरावे आढळून आले नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### वैभव गायकवाड निर्दोष? पोलिसांचा दावा

गेल्या वर्षभरापूर्वी उल्हास नगर हिल लाईन पोलिस ठाण्यातील वरिष्ठ निरीक्षकांच्या केबिनमध्ये तत्कालीन आमदार गणपत गायकवाड यांनी महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला होता. या प्रकरणात गणपत गायकवाड अद्याप तुरुंगात असून, त्यांच्यासह काही इतर आरोपींना अटक करण्यात आली होती. सुरुवातीला या प्रकरणात गणपत गायकवाड यांचे पुत्र वैभव गायकवाड यांचेही नाव समाविष्ट करण्यात आले होते. नुकत्याच सादर झालेल्या पुरवणी चार्ज शीटमध्ये वैभव गायकवाड यांचे नाव वगळण्यात आल्याचे समोर आले आहे. याबाबत पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले की, गोळीबाराच्या घटनेत वैभव गायकवाड यांचा थेट सहभाग असल्याचे कोणतेही ठोस पुरावे उपलब्ध नाहीत. तसेच, गोळीबार होण्यापूर्वीच ते पोलीस ठाण्याबाहेर पडले होते, हे सीसीटीव्ही फूटेजमधून स्पष्ट झाल्याने त्यांचे नाव चार्जशीट मधून वगळण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### महेश गायकवाड यांचा उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा

दरम्यान, या निर्णयावर माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महेश गायकवाड यांनी सांगितले की, माझ्यावर उल्हास नगर हिल लाईन पोलिस ठाण्यात गोळीबार झाला, त्यात वैभव गायकवाड याचा सहभाग होता. तो सीसीटीव्हीमध्ये दिसतो आणि त्याने गुंड प्रवृत्तीच्या लोकांना पोलीस ठाण्यात बोलावले होते. मात्र, पोलिसांवर राजकीय दबाव असल्यामुळे कारवाई होत नाही. त्यामुळे मी कायदेशीर सल्ला घेऊन उच्च न्यायालयात दाद मागणार आहे.

### माजी आमदार गणपत गायकवाड तुरुंगात

गोळीबाराच्या घटनेनंतर गणपत गायकवाड यांना अटक करण्यात आली. सध्या ते तळोजा कारागृहात आहेत.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने त्यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यांना महायुतीच्या उमेदवार म्हणून उमेदवारी दिली. महेश गायकवाड यांनी त्यांच्याविरोधात अपक्ष म्हणून निवडणूक लढवली, मात्र सुलभा गायकवाड यांनी विजय मिळवत कल्याण पूर्व मधील गायकवाड कुटुंबाची सत्ता कायम ठेवली. या प्रकरणी पुढील कायदेशीर लढाईत काय घडते, याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

# रांजणगाव ग्रामपंचायतीसाठी घोड धरणावरून नवी पाणी पुरवठा योजना

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई , दि. २५ : पुणे जिल्ह्याच्या शिरुर तालुक्यातील रांजणगाव गणपती ग्रामपंचायतीचे आध्यात्मिक, तीर्थपर्यटनाच्या दृष्टीने असलेले महत्व तसेच ग्रामपंचायत हद्दीत एमआयडीसी असल्यामुळे या क्षेत्रात स्थलांतरीत लोकसंख्येचे प्रमाण अधिक असून भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन जलजीवन मिशनअंतर्गत घोड धरणावरून नवीन पाणीपुरवठा योजना तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज संबंधित अधिकारी आणि यंत्रणांना दिल्या. रांजणगावची भविष्यातील गरज ओळखून ग्रामपंचायत परिसरात मोठ्या क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी जिल्हा नियोजन समिती, स्वच्छ भारत मिशनमधून निधी देण्यात येईल, त्यासोबत ग्रामपंचायतीच्या वाट्यासह सीएसआर निधी उभारण्याच्या सूचना त्यांनी जिल्हाधिकारी यांना दिल्या.



विविध प्रश्नांसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला उद्योगमंत्री उदय सामंत (दूरदृश्य प्रणालीद्वारे), पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील, माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील (दूरदृश्य प्रणालीद्वारे), वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार (दूरदृश्य प्रणालीद्वारे), पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक कुणाल खेमनार, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता वैशाली आवटे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे जनरल मॅनेजर (भूसंपादन) बप्पासाहेब थोरात यांच्यासह संबंधित विभाग व यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार बैठकीत मार्गदर्शन करताना म्हणाले की, अष्टविनायकांपैकी असलेले रांजणगाव गणपती हे ठिकाण राज्यातील एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र, पर्यटनस्थळ म्हणून नावारुपाला आले आहे. या परिसरात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अनेक उद्योग-व्यवसाय उभे राहिले आहेत. त्यामुळे रांजणगाव गणपती ग्रामपंचायत हद्दीत स्थलांतरीत लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. त्याचा ताण ग्रामपंचायतीच्या पायाभूत सुविधांवर पडत आहे. यासह भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन जलजीवन मिशनअंतर्गत घोड धरणावरून नवीन पाणी पुरवठा योजना तातडीने मार्गी लावावी. रांजणगाव गणपती ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येला आवश्यक नागरी सुविधा देण्यासाठी पुरेशा क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक निधी जिल्हा नियोजन समिती, स्वच्छ भारत मिशनमधून देण्यात येईल, त्याचसोबत ग्रामपंचायतीच्या हिश्श्यासह उद्योजकांकडून सामाजिक दायित्व (सीएसआर) निधी उभारण्यात यावा. रांजणगाव गणपती, कारेगाव, ढोकसावंगी या ग्रामपंचायतीकडून सूचविण्यात आलेली विकासकामे एमआयडीसी मार्फत करण्याच्या सूचना त्यांनी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना दिल्या. हिवरे पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाण्याची उपलब्धता, लोकसंख्या आणि नागरिकांची वाढीव पाण्याची गरज लक्षात घेऊन यंत्रणांनी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देत यासाठीचा आवश्यक तो निधी राज्य शासनामार्फत उपलब्ध करुन दिला जाईल, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

### मुंबईत पुढील दोन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा

**तापमान ३८ अंशांपर्यंत जाणार**

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई , दि. २५ : हवामान खात्याने महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये उष्णतेसाठी एलो अलर्ट जारी केला आहे. आयएमडीनुसार, मुंबई आणि आसपासच्या भागात मंगळवार आणि बुधवारी उष्णतेची लाट म्हणजेच तीव्र उष्णता जाणवू शकते. तापमान ३७ ते ३८ अंशांपर्यंत जाईल. हे सामान्य पेक्षा ५ अंश सेल्सिअस जास्त आहे.

लोकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. हवामान खात्याच्या वतीने दिलेल्या माहितीनुसार, पुढील ४ दिवसांत ११ राज्यांमध्ये उष्णता वाढेल. यामध्ये महाराष्ट्र, गोवा, गुजरात, दादरा नगर हवेली, दमण आणि दीव, जम्मू आणि काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड यांचा समावेश आहे.दिल्लीतील तापमान सामान्य पेक्षा जास्त आहे.

काल शहराचे कमाल तापमान २७.५ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, जे सामान्य पेक्षा २ अंशांनी जास्त आहे. याशिवाय, कोकण, गोवा आणि किनारी कर्नाटकातील काही भागात २८ फेब्रुवारीपर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे.

# संजय राऊतांकडून फडणवीसांचे कौतुक

### 'फिक्सर'ची नावे टाळल्याबद्दल अभिनंदन



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई , दि. २५ : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले आहे. राज्याच्या हितासाठी त्यांनी घेतलेल्या निर्णयांना आमचा पाठिंबा असल्याचे राऊत यांनी म्हटल आहे. तर राज्याचे नुकसान टाळल्याबद्दल त्यांनी फडणवीसांचे अभिनंदन देखील केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्र्यांनी शिफारस केलेल्या पीए आणि ओएसडीची नियुक्ती करताना फिक्सर आणि चौकशी सुरु असलेल्या अधिकाऱ्यांची नावे वगळली आहेत. मुख्यमंत्र्यांच्या याच निर्णयाबद्दल संजय राऊत यांनी फडणवीस यांचे कौतुक केले आहे. इतकेच नाही तर ही सर्व नावे एकनाथ शिंदे यांच्या मंत्र्यांकडूनच आलेली होती, असा दावा देखील त्यांनी केला आहे. फडणवीस आणि आता या फिक्सर्सची नावे जाहीर करावी, असे आवाहन देखील त्यांनी दिले आहे. मंत्र्यांचे पीएसडी नेमण्याचा अधिकार हा मुख्यमंत्र्यांनाच असतो. मंत्री केवळ नावांची शिफारस करत असतात. तो प्रस्ताव आल्यानंतर मुख्यमंत्री त्यावर अंतिम निर्णय करतात. हे काही नव्याने होत नाही. यासंबंधी मंत्रिमंडळ बैठकीत देखील मी सांगितले आहे. मंत्र्यांनी हवे ती नावे पाठवावी. मात्र त्या नावांमध्ये ज्यांची नावे फिक्सर म्हणून किंवा चुकीच्या कामांमध्ये आहेत. त्यांना मान्यता देणार नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट सांगितले आहे. यात आतापर्यंत १२५ च्या जवळपास नावे माझ्याकडे आली आहेत. त्यातील १०९ नावे क्लियर केलेली आहेत. उर्वरित नावे क्लियर केलेली नाही. कारण त्यांच्यावर कुठला तरी आरोप आहे किंवा त्यांची चौकशी सुरू आहे. त्यामुळे कोणीही नाराज झाले तरी अशा प्रकारच्या नावांना मान्यता देणार नसल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केला आहे. यावरुन राऊत यांनी आता फडणवीसांना पाठिंबा दर्शवला आहे. मुख्यमंत्र्यांकडे ज्या फिक्सर अधिकाऱ्यांची नावे शिंदे यांच्या मंत्र्यांनी दिली होती, त्यांची नावे जाहीर करण्याची मागणी राऊत यांनी केली आहे. ही नावे माझ्याकडे देखील असल्याचा दावा त्यांनी केला. महाराष्ट्रात गेल्या अडीच ते तीन वर्षांमध्ये घटनाबाह्य सरकार होते. त्या काळात महाराष्ट्रात आर्थिक आराजकता माजली होती. ५०० कोटींचे टेंडर ५००० कोटी पर्यंत वाढवण्याचे काम केले गेले. त्यांनी ठेकेदाराकडून वर्क ऑर्डर निघण्याआधी ५०० ते ६०० कोटी रुपये घेऊन ते मोकळे होत गेले. अशा सगळ्या कामांना राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना स्थगिती दिल्याची माहिती आम्हाला समजली असल्याचेही राऊत यांनी म्हटले आहे.

# महाराजांचे बलिदान न दाखवण्याचा माध्यमांचा दबाव होता

### 'स्वराज्यरक्षक संभाजी' मालिकेबाबत अमोल कोल्हेंचा खुलासा

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई , दि. २५ : छत्रपती संभाजी महाराजांच्या आयुष्यावर आधारित 'छावा' चित्रपट सध्या धुमाकूळ घालत आहे. चित्रपटाच्या क्लायमॅक्स सीनमुळे प्रेक्षक पाणावलेल्या डोळ्यांनी चित्रपटगृहाच्या बाहेर पडत आहे. 'छावा' सिनेमासोबतच अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांची 'स्वराज्यरक्षक संभाजी' ही मालिका पुन्हा एकदा चर्चेत आली. स्वराज्यरक्षक संभाजी या मालिकेतील शेवटाबाबत काही प्रश्न उपस्थित केले गेले. यावर डॉ. अमोल कोल्हे यांनी खुलासा केला आहे. स्वराज्यरक्षक संभाजी मालिकेचा शेवट विशिष्ट पद्धतीने दाखवण्याचा माझ्यावर माध्यमांचा दबाव होता, असे अमोल कोल्हे म्हणाले. फॉल्स नरेटिव्ह पसरवण्यात येत आहे, त्याबद्दल मी दबाव शब्द वापरला, असे स्पष्टीकरणही अमोल कोल्हे यांनी दिले आहे. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित आणि विकी कौशलची मुख्य भूमिका असलेल्या 'छावा' या चित्रपटाच्या शेवटी छत्रपती संभाजी महाराजांच्या छळाचा सीन दाखवण्यात आला आहे. मात्र 'स्वराज्यरक्षक संभाजी' मालिकेत तो सीन दाखवण्यात आला नव्हता. त्यामुळे या मालिकेचा शेवट गुंडाळण्यात आला का? मालिकेचा शेवट विशिष्ट पद्धतीने दाखविण्या संदर्भात कुणाचा दबाव होता का? यामध्ये काही राजकीय हेतू होता का? आणि स्वराज्यरक्षक संभाजी महाराजांचा अंत न दाखवण्यामागे शरद पवारांची काही विशेष सूचना होती का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. डॉ. अमोल कोल्हे यांनी एका व्हिडिओद्वारे या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली आहेत.



### काय म्हणाले अमोल कोल्हे?

स्वराज्यरक्षक संभाजी ही मालिका संपून आता पाच वर्षांहून अधिकचा काळ लोटला. तरीही ही मालिका प्रेक्षकांच्या मनात घर करून राहिली आहे. या यशात चाहत्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. सध्या थिएटरमध्ये असलेला छावा चित्रपट अतिशय उत्तम आहे. तो पाहण्याचे मी आवाहन केलेले आहेच. यामुळे छत्रपती संभाजी महाराजांचा अनेक वर्ष दडवलेला इतिहास समोर येत आहे.

# ठाणे महापालिकेची अनधिकृत शाळांविरोधात कडक कारवाई

**ठाणे** : ठाणे महापालिका क्षेत्रातील एकूण ८१ अनधिकृत शाळांविरोधात कठोर कारवाई करण्यात आली आहे. महापालिकेच्या शिक्षण विभागाने या सर्व शाळांविरोधात पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, त्यापैकी ६८ शाळांविरोधात एफआयआर नोंदवण्यात आला आहे, तर उर्वरित १३ शाळांविरोधात एफआयआर दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या अनधिकृत शाळांमध्ये एकूण १४,७०८ , विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी त्यांचे अधिकृत शाळांमध्ये समायोजन करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे.

महापालिका आयुक्तांनी घेतला आढावा. ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नुकताच या अनधिकृत शाळांच्या स्थितीचा आढावा घेतला. यामध्ये अनेक शाळांची कोणतीही नोंदणी नाही, तर काही शाळा अनधिकृत इमारतींमध्ये आणि काही भाड्याच्या जागेत सुरू असल्याचे आढळून आले. यासंदर्भात उपायुक्त (शिक्षण) सचिन सांगळे यांनी माहिती देताना सांगितले की, या सर्व अनधिकृत शाळांची यादी स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

# ठाकरेंच्या शिवसेनेचा राज्यव्यापी दौरा

**२मार्चला ठाण्यातून शुभारंभ**

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई , दि. २५ : आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने राज्यव्यापी दौऱ्याची घोषणा केली असून, २ मार्च रोजी ठाण्यातून या दौऱ्याचा प्रारंभ होणार आहे. या दौऱ्याची सुरुवात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे कट्टर समर्थक आनंद दिघे यांच्या स्मृतीस्थळी अभिवादन करून होईल. हा दौरा ठाकरे गटासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून, त्याद्वारे पक्षाच्या संघटनात्मक ताकदीचे दर्शन घडवण्याचा आणि भाजप-शिंदे गटाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### सरकारविरोधात हल्लाबोल

ठाकरेंच्या शिवसेनेने गेल्या काही महिन्यांत अधिक आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्यातील अनेक प्रश्नांवर सत्ताधारी शिंदे-फडणवीस सरकारला घेरण्याची रणनिती या दौऱ्यात आखण्यात येणार आहे.


महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया
ई-निविदा प्रणाली अंतर्गत ई-निविदा प्रसिध्द करणे
ई-निविदा सुचना क्र. ११ (सन २०२४-२५) प्रथम वेळ (मजूर सहकारी संस्था)
मजूर सहकारी संस्था यांचेकडून ई-निविदा मागविण्याबाबत.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया या कार्यालया अंतर्गत मंजूर कामांचे पपत्र बी-१ मध्ये दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, गोंदिया येथे नोंदणीकृत/वर्गीकरण केलेल्या मजूर सहकारी संस्था यांचेकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. प्रसिध्द कामांची निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाची आहे. या निविदेमधिल कामाबाबत अटी व शती ई. संपूर्ण माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर निविदा प्रसिध्द दि. २५/२/२५ पासून पाहण्यास उपलब्ध आहेत. तसेच जिल्हा परिषद, बांधकाम विभाग गोंदिया चे नोटीस बोर्डवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याबाबतचे सर्व शुध्दिपत्रके सुध्दा वरिल संकेतस्थळावरच प्रसिध्द करण्यात येतील.

ई-निविदा पध्दतीचा तपशिल

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | दिनाक : २५/२/२५ पासुन |
| ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड प्रांरभ (Start) | दिनांक : २५/०२/२०२५ सकाळी ११.०० वाजेपासुन |
| ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड समाप्त (End) | दिनांक:-०३/०३/२०२५ चे सायं. ५.०० वाजेपर्यंत. |
| ऑनलाईन निविदा उघडणे. (शक्य झाल्यास) | कार्यकारी अभियंता जि.प. सा.बा. विभाग गोंदिया यांचे कक्षात संबधित निविदाधारकांचे समक्ष दिनांक:- ०४/०३/२५ रोजी दुपारी ५:३० वाजेपासुन लिफाफा क्रमांक-१ उघडण्यात येईल. (शक्य झाल्यास) |

दिनांक :-

(अतलकुमार मेश्राम) कार्यकारी अभियंता, जि.प. सा.बा. विभाग, गोंदिया

(जनार्दन ह. खोटरे) मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद, गोंदिया

(डॉ. तानाजी लोखडे) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया

### फळांची वाढती मागणी

**अकोला** :महाशिवरात्रीचा उपवास असतो.यासाठी फळे आणि फराळाच्या पदार्थांची मागणी राहणार आहे. बाजारात विविध प्रकारची फळे उपलब्ध आहेत. साबूदाणा ६० ते ८० रुपये किलो, शेंगदाणे १००ते १२० रुपये, पेंड खजूर १०० ते ४५० रुपये किलो. तर, पेरूचे भाव ८० ते १०० रुपये, अंगूर १००रुपये किलो, सेप १०० ते १६०रुपये, केळी ४० ते ५० रुपयेकिलो. तसेच बटाटे आणि रताळे यांना देखील मागणी असते.

# राजराजेश्वर मंदिरात महाशिवरात्रीची तयारी पूर्ण



**■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)**:

हिंदू धर्मात महाशिवरात्रीचे विशेष महत्त्व आहे. या दिवशी, विधीनुसार महादेवाची पूजा करण्यासोबतच उपवास देखील केला जातो. मान्यतेनुसार, महाशिवरात्रीच्या दिवशी महादेव आणि माता पार्वती यांचा विवाह सोहळा पार पडला होता. अनेक भक्त महाशिवरात्रीचे व्रत आणि पूजा करतात. महाशिवरात्रीची पूजा केल्यामुळे तुमच्या सर्व इच्छा पूर्ण होतात आणि तुमच्या महत्त्वाच्या कामांमध्ये प्रगती होते. महाशिवरात्रीच्या दिवशी दोन प्रकारचे व्रत केले जातात. महाशिवरात्रीच्या दिवशी निर्जला व्रत किंवा फळांचे व्रत केले जाते. या दिवशी म हादेवाच्या पिंडीची पूजा केली जाते. महाशिरात्रीची पूजा प्रसन्न आणि सकारात्मक मनानी केली पाहिजे. महाशिवरात्रीच्या दिवशी व्रत केल्यामुळे तुमच्या कामांना यश मिळण्यास मदत होते. म हाशिवरात्रीच्या दिवशी काही विशेष गोष्टींचे पालन केल्यामुळे तुमच्या आयुष्यामध्ये प्रगती होते. महाशिवरात्रीच्या दिवशी निर्जला उपवास केल्या मुळेतुम्हाला महादेव आणि माता पार्वतीचा आशिर्वाद मिळण्यास मदत होते. निर्जला व्रत म्हणजे पाणी किंवा अन्न न घेता संपूर्ण दिवस आणि रात्र उपवास केला जातो. अशा परिस्थितीमध्ये म हाशिवरात्रीच्या दिवशी नेमकं काय खाल्लं पाहिजेल असा प्रश्न सर्वांना पडतो.फाल्गुन महिन्यातील कृष्ण पक्षातील चतुर्थी तिथीला म्हणजेच २६ फेब्रुवारी बुधवारी सकाळी ११:०८ वाजल्यापासून २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८:५४ वाजेपर्यंत असणार आहे. महाशिवरात्रीची पूजा रात्री केली जाते, म्हणून महाशिवरात्रीचे व्रत २६ फेब्रुवारी रोजी केली जाणार. महाशिवरात्रीच्या उपवासात विविध प्रकारची फळे खाऊ शकतात. तुम्ही साबुदाण्याची खिचडी किंवा वडा, चेस्टनटच्या पिठापासून बनवलेली रोटी किंवा पराठा, मखाना खीर किंवा भाजलेला मखाना, दूध, दही आणि चीज, सुका मेवा खाऊ शकता. महाशिवरात्रीच्या उपवासात तामसिक पदार्थाचे सेवन करू नये. महाशिवरात्रीच्या दिवशी सकाळी लवकर उठून महादेवाच्या मूर्तीला किंवा शिवलिंगाला पंचामृताने अभिषेक करा. या वेळी 'ॐ नमो नमः शिवाय' या मंत्राचा जप करत रहा. यानंतर, संध्याकाळी फळांनी उपवास सोडा. महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी, सकाळी लवकर उठून स्नान इत्यादी केल्यानंतर, भगवान शिवाची योग्य पद्धतीने पूजा करा आणि त्यांचा गंगाजलने अभिषेक करा. शिवरात्रीच्या उपवासाच्या वेळी फक्त सात्विक अन्नच सेवन करावे हे लक्षात ठेवा. या दिवशी दान द्यावे. असे केल्याने तुम्हाला महाशिवरात्रीच्या उपवासाचे पूर्ण फायदे मिळतात.

# नियमित लसीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करा : रामदास सिद्धभट्टी





**■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)**:

नियमित लसीकरणात समाविष्ट सर्व रोगप्रतिबंधक लसींचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देश अतिरिक्त जिल्हाधिकारी रामदास सिद्धभट्टी यांनी आज येथे दिले.नियमित लसीकरण टास्क फोर्सच्या बैठक अति. जिल्हाधिका-यांच्या दालनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजीकर, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, मनपा वैद्यकीय अधिकारी आदी उपस्थित होते.श्री. सिद्धभट्टी म्हणाले की, क्षयरोग, डिप्थीरिया, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओमायलाईटिस, गोवर, हिपॅटायटीस बी, अतिसार, जपानी एन्सेफलायटीस, एमआर, न्यूमोनिया आणि न्यूमोकोकल रोग आदींच्या लसी लसीकरणात समाविष्ट आहेत. बहुतेक लसींचे लसीकरण ८० टक्क्यांवर झाले आहे. तथापि, उर्वरित अल्प कालावधी लक्षात घेता ते तातडीने पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी दिले.बीसीजी, पोलिओ व हिपॅटायटिस बी लसीकरण हा बाळाचा जन्मसिद्ध अधिकार आहे. खासगी रूग्णालयांत हे लसीकरण झाले पाहिजे. एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये. बाळापूर तालुक्यात लसीकरण वाढविण्यासाठी प्रयत्न व्हावेत. सहा वर्षांवरील शाळकरी मुलांच्या लसीकरणातही कुणीही सुटता कामा नये. त्यासाठी शिक्षण विभागाने सहकार्य करावे. काही ठिकाणी बालकांच्या लसीकरणाबाबत पालक अनुत्सुक असतात. तिथे अधिकाधिक जनजागृती व प्रबोधन करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## महिलाभगिनींच्या श्रमातून 'माविम'च्या रोपट्याचे वृक्षात रुपांतर



**■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)**:

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी दम दार वाटचाल करत आहे. ५० वर्षापूर्वीच्या या रोपट्याचा आता महावृक्ष झाला असून, त्यामागे खेड्यापाड्यातील महिलाभगिंनीचे परिश्रम आहेत, असे प्रतिपादन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर यांनी आज येथे केले.'माविम'च्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रम मलकापूर येथील स्व. लोभाजी आप्पा गवळी मंगल भवनात आज झाला, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार, महामंडळाच्या जिल्हा सम न्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे, बाल संरक्षण अधिकारी राजू लाडुलकर आदी उपस्थित होते.

श्री. पुसदकर म्हणाले की, म हिला बचत गटांच्या उत्पादनांसाठी स्वतंत्र बाजारपेठ विकसित होणे आवश्यक आहे. गटांनी लोणची, पापड, मसाला आदी उत्पादनांपुरते मर्यादित न राहता बाजारपेठेचा वेध घेऊन नवनवी उत्पादने आणावीत. उत्पादनांच्या ब्रॅडिंगसाठी प्रयत्न करावेत. श्री. पवार यांनीही मनोगत व्यक्त केले.

यावेळी बचत गटांमुळे परिवर्तनाबाबत रशिदा बी शेख व शोभा लाहोडे यांनी अनुभवकथन केले. श्रीमती खोब्रागडे यांनी प्रास्ताविक केले.

# आज पातूरातील काशी कवळेश्वर महादेव मंदिरावर महाशिवरात्री महोत्सवाचे आयोजन

*** दरवर्षी सात ते आठ क्विंटल साबुदाणा उसळ शिवभक्तांना केली जाते वितरीत**

*** वर्गणीच्या स्वरुपात पैसे न घेता मंदिरावरच फराळाचे साहित्याचा भक्ता कडून स्वीकार**



**■पातुर,दि.२५ (प्रतिनिधी)**:

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पातुर येथील श्री काशी कवळेश्वर महादेवाच्या मंदिरावर महाशिवरात्री महोत्सवाचे भव्य स्वरूपात आयोजन आज दिनांक २६/२/२०२५ला काशी कवळेश्वर भजन मंडळ तथा समस्त शिवभक्त मंडळ यांच्याकडून आयोजन करण्यात आले आहे प्रातःकाळी ब्रह्म मुहूर्तावर श्री महादेवाच्या लिंगाला रुद्राभिषेक करण्यात येतो त्यानंतर सकाळच्या सुमारास दर्शणार्थी शिवभक्तांना भजन मंडळाकडून महाशिवरात्री उपवासा निमित्त साबुदाण्याची उसळ फराळ स्वरूपात वितरित करण्यात येते. दरवर्षी या ठिकाणी शेकडो शिवभक्तांना साबुदाणा उसळीचा फराळ दिल्या जातो एकूण सात ते आठ क्विंटल उसळीचा महाप्रसाद वाटला जातो हर हर म हादेव चा गजर करत शिवभक्त काशी कवळेश्वर महादेव मंदिरावर दर्शनासाठी येतात सदर शिव मंदिर अत्यंत पुरातन असून पातुर शहराच्या दक्षिणेकडे तीन ते चार किलोमीटर अंतरावर चिचखेड शिवारामध्ये आहे सदर मंदिर अत्यंत गर्द वनराईत आहे मंदिराला लागूनच चक्रधर स्वामींच्या चरणांकित पादुका असून भव्य मंदिर महानुभावांचे आराध्य दैवत असून सदर स्थळाला शासकीय तीर्थ क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे या ठिकाणी भूविकास बँकेचे व्यवस्थापक स्वर्गीय दत्तात्रय गिरोलकर, प्रल्हाद यादव, रामभाऊ ढगे, प्रकाश तायडे, शामरावजी गिऱ्हे,लक्ष्मण गुजर, सुरेश कोथळकर,पंजाबराव सुरवाडे, बळीराम सातव,बंडू पाटील,रामराव माहुलीकर,जयवंत पुरुषोत्तम आदींनी ४० वर्षापासून या ठिकाणी दर सोमवारी हरिनाम स्मरणाची पंचपती आरती ची मूर्तमेढ रोवली ती कायम ठेवत सध्याच्या तरुणाईने या ठिकाणी दर सोमवारी हरिनाम स्मरणाची पंचपती आरती ची परंपरा राखली तथा दरवर्षी महाशिवरात्री महोत्सवाचे आयोजन करून या ठिकाणी शिवभक्तांना महाशिवरात्री उपवासानिमित्त उसळचा प्रसाद वितरित केल्या जातो तथा हर हर महादेव चा गजर अखंड हरिभजन खंजेरी भजनाचा खडखडाट ऐकून शिवभक्त मंत्रमुग्ध होतात सम स्त शिवभक्तांनी काशी कवळेश्वर संस्थानवर उसळचा प्रसाद आणि दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन काशी कवळेश्वर भजन मंडळ समस्त शिवभक्त यांच्याकडून करण्यात आले आहे

लोकवर्गणीला घाला आळा/ सेवेचे व्रत पाळा ह्या म्हणीप्रमाणे शिवभक्तांनी देणगी दात्याकडून पैशाच्या स्वरूपात वर्गणी न घेता काशी कवळेश्वर संस्थानवर उसळीच्या प्रसादाचे साहित्य शेंगदाणे साबुदाणा खाद्यतेल तथा इतर साहित्य वर्गणी स्वरूपात शिवभक्ता कडून स्वीकारल्या जाते शिवभक्त स्वर्गीय प्रल्हाद यादव यांनी आजीवन गावरान गुळाचा चहा ते प्रसाद रूपाने शिवभक्तांना वितरितकरत होते त्यांच्या मरणोप्रांत त्यांचे चिरंजीव संजय यादव पैलवान किशोर यादव यांनी कायम ठेवली असून दरवर्षी समस्त शिवभक्तांना गावरान गुळाचा चहा प्रसाद रूपाने वाटण्यात येतो

### विदर्भ साहित्य संघ व 'अक्षरा-२' यांच्या संयुक्त विद्यमाने

# 'अभिजात मराठी' कार्यक्रमाचे आयोजन



**■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)**:

कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा' दर्जा प्राप्त झाल्यानंतर विदर्भ साहित्य संघ; शाखा अकोला व अकोल्याच्या साहित्य, कला व संस्कृती चळवळीतील महिला समूहांच्या 'अक्षरा-२' यांच्या संयुक्त विद्यमाने 'अभिजात मराठी' या बहारदार कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.०० वाजता प्रभात किड्स स्कूल, तोष्णीवाल ले-आऊट, शासकीय दुध डेअरीच्या मागे, अकोला येथे केले आहे.'अभिजात मराठी' या कार्यक्रमात मराठी भाषा विषयक विविध प्रवाहांचा आलेख, मराठी भाषा गौरव गीत, महानुभाव वायय दर्शन, संतवाणी, जात्यावरच्या ओव्या आदी अनेक महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश आहे. या कार्यक्रमाला सुजाण रसिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन विदर्भ साहित्य संघ; शाखा अकोला व 'अक्षरा -२' समूहातर्फे करण्यात आले आहे.

## बेपत्ता अल्पवयीन मुलीचा शोध नाही

**■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)**:

गेल्या नोव्हेंबरमध्ये बेपत्ता झालेल्या एका अल्पवयीन मुलीचा चार महिने उलटूनही शोध लागलेला नसल्याने पालकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे निवेदन दिले आहे. डाबकी रोड भागातील रहिवाशी आणि सिव्हिल लाईन हद्दीत दर्शनासाठी जाते असे सांगून घरुन निघालेली ही तरुणी सिव्हिल लाईन हद्दीतून एका तरुणाच्या दुचाकीवरुन बसून पसार झाली होती.

# वार्षिक संमेलन 'आरोहण २k२५' चे उत्साहात उद्घाटन



**■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)**:


डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या कृषी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, अकोला येथे 'आरोहण २k२५' या वार्षिक संमेलनाचा भव्य उद्घाटन सोहळा दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ४ वाजता संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. कुलगुरू डॉ. एस. आर. गडाख यांच्या अध्यक्षतेखाली झाले. आपल्या उद्घाटनपर भाषणात त्यांनी कृषी अभियांत्रिकीच्या राष्ट्रउभारणीतील महत्त्वावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना देता येईल आणि शेती अधिक शाश्वत व उत्पादक बनविता येईल.कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून प्रसिद्ध हास्यकवी 'मिर्झा एक्सप्रेस' अर्थात डॉ. मिर्झा रफी अहमद बैग उपस्थित होते. आपल्या विनोदी शैलीत त्यांनी विद्यार्थ्यांना आनंदित करत शिक्षण व सामाजिक मूल्यांवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाला डॉ. व्ही. के. खर्चे, संशोधन संचालक, विस्तार शिक्षण संचालक डॉ. आर. एम. गाडे, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय आदी मान्यवर उपस्थित होते.या सोहळ्यात डॉ. एस. आर. कळबांडे, सहयोगी अधिष्ठाता, कृषि अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, डॉ. सुचिता गुप्ता, विभाग प्रमुख, कृषि स्थापत्य अभियांत्रिकी, डॉ. एम. एम. देशमुख, विभाग प्रमुख, सिंचन व निचरा विभाग, डॉ. ए. आर. म्हसके, विभाग प्रमुख, मृद व जल संधारण अभियांत्रिकी, डॉ. पी. एच. बकाने, विभाग प्रमुख, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग, डॉ. ए. व्ही. गजाकोस विभाग प्रमुख, कृषि शक्ती व औजारे विभाग, तसेच जिमखाना उपाध्यक्ष डॉ. डी. एस. कराळे आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली.

## थोडक्यात

### सेट परीक्षेसाठी १३ मार्चपर्यंत भरता येणार ऑनलइन अर्ज



**अकोला** : महाराष्ट्र व गोवा राज्यांतील विद्यार्थ्यांसाठी सहायक प्राध्यापकपदाच्या पात्रतेसाठी घेतली जाणारी सेट परीक्षा येत्या १५ जून रोजी आयोजित करण्यात आलीआहे. या परीक्षेसाठी येत्या २४ फेब्रुवारीपासून १३ मार्चपर्यंत ऑनलाइन पद्धतीने अर्ज स्वीकारले जाणार आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार सेट परीक्षा येत्या १५ जून रोजी घेतली जाणार आहे. ही परीक्षा मुंबई, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, अहिल्यानगर, नाशिक, धुळे, जळगाव, छ. संभाजीनगर, नांदेड, अम रावती, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, रत्नागिरी परभणी नंदुरबार पणजीया केंद्रांवर घेण्यात येईल.परीक्षेसाठी या ऑनलाईन अर्ज स्वीकारले जाणार आहे.

### स्प्रिंकलर नोझलची चोरी

**अकोला** : शिवर येथून जवळच असलेल्या डोंगरगाव येथील शेतकरी सुखदेव वानरे तसेच नामदेव वानरे यांच्या शेतीमधील स्प्रंकलरचे पितळी नोझल रविवारी (दि. २२ ) चोरट्यांनी चोरुन नेले आहेत. कुंभारी शिवारात त्यांची शेती येत असून स्प्रंकलरचे पितळी नोझल चोरणाऱ्या चोरट्यांनी या परिसरात प्रचंड धुमाकूळ घातला आहे.

### अकोला महापालिका महिला बालकल्याण विभाग व राज्य शासनाच्या योजनेतून

# पिंक ई-रिक्शा योजना महिलांना रोजगारासाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी

**■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)**:

अँड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्पाचे प्रमुख निलेश देव यांनी अकोला महानगरपालिका आयुक्तांना निवेदन सादर केले असून, महिलांच्या सक्षमीकरणासाठी पिंक ई-रिक्शा योजना त्वरित राबविण्याची मागणी केली आहे.राज्य शासनाच्या पुढाकाराने शहरातील बेरोजगार महिलांसाठी ही योजना अनेक महानगरपालिकांमध्ये यशस्वीपणे राबवली जात आहे. या योजनेत महानगरपालिका, राज्य शासन आणि बँक यांच्या सहकार्याने महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. अकोला महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या अर्थसंकल्पात ३% निधी राखीव असतो, त्याचा उपयोग करून या योजनेसाठी आवश्यक तरतुद करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी आणि शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या सुधारणेसाठी पिंक ई-रिक्शा योजना अत्यंत उपयुक्त ठरेल, असे नमूद करत मनपाने विशेष लक्ष घालून ही योजना त्वरित अंमलात आणावी, अशी मागणी अँड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्पाने केली आहे.

# होळीनिमित्त मध्य रेल्वेवर २८ विशेष गाड्या धावणार!

**■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)**:

होळीनिमित्त मध्य रेल्वे मार्गावर मुंबई-नागपूर, मडगाव, नांदेड आणि पुणे - नागपूर दरम्यान २८ विशेष गाड्या चालवणार आहे. सणाच्या काळात प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन या विशेष रेल्वेची घोषणा करण्यात आली आहे.छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-नागपूर- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस द्वि-साप्ताहिक विशेष ट्रेन क्रमांक ०२१३९ ही द्वि-साप्ताहिक छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ९, ११, १६ आणि १८ मार्च रोजी ००:२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी पोहोचेल. १५:१० वाजता ट्रेन ट्रेन क्रमांक ०२१४० ही द्वि-साप्ताहिक विशेष ट्रेन नागपूर येथून ९, ११, १६ आणि १८ मार्च रोजी रात्री ८ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी दुपारी १:३० वाजता पोहोचेल. या गाडीला दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनम ाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा येथे थांबा देण्यात आला आहे.पुणे-नागपूर साप्ताहिक गाडी पुणे-नागपूर-पुणे साप्ताहिक विशेष ट्रेन क्रमांक ०१४६९ ही ११ व १८ म ार्च रोजी पुणे येथून दुपारी ३:५० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ६:३० वाजता पोहोचेल. ट्रेन क्रमांक ०१४७० नागपूर येथून १२ व १९ मार्च रोजी सकाळी ८ वाजता सुटेल आणि पुणे येथे त्याच दिवशी रात्री ११:३० वाजता पोहोचेल. तसेच पुणे-नागपूर-पुणे साप्ताहिक विशेष ट्रेन क्रमांक ०१४६७ ही पुणे येथून १२ व १९ मार्च रोजी दुपारी ३:५० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ६:३० वाजता पोहोचेल. ट्रेन क्रमांक ०१४६८ ही नागपूर येथून १३ व २० मार्च रोजी सकाळी ८ वाजता सुटेल.

# ग्रंथराज ज्ञानेश्वरी माऊलींचे परम दर्शन घडते : ज्ञानेश्वर महाराज शिंदे






**■अकोट,दि.२५ (प्रतिनिधी)**:

ग्रंथराज ज्ञानेश्वरी अलौकिक असा ग्रंथ आहे. त्यातील प्रत्येक ओवी व ओवीतील प्रत्येक शब्दार्थात ज्ञानराज माऊलींच्या अलौकिक प्रतिभेचे प्रतिबिंब उमटते.. हा खरा ज्ञान कुंभ आहे. ज्ञानेश्वरी म्हणजे माऊलींचे परम दर्शन होय.असे चिंतन आळंदीच्या वारकरी शिक्षण संस्थेचे विश्वस्त त्याचा अध्यापक ह.भ.प. श्री ज्ञानेश्वर महाराज शिंदे यांनी केले.गुरुमाऊली श्री संत वासुदेव महाराज यांच्या १०८व्या जयंतीनिमित आयोजित श्री ज्ञानेश्वरी भाव कथेचे दुसरे पुष्पगुंतांना ज्ञानेश्वर महाराज बोलत होते. ते पुढे म्हणाले ज्ञानराज माऊली कैवल्याचा पुतळा आणि चैतन्याचा जिव्हाळा आहेत. साधकांचे ते मायबाप आहेत. त्यांच्या दर्शनाने सर्व पाप दूर होतात व सर्व सुख प्राप्त होते. हा संत महिमा आहे.साधकाला संत ओळखता आला पाहिजे. संत मिळणे अवघड आहे. संतांची ओळख करता आली पाहिजे. त्यांची लक्षणेही समजली पाहिजे संत हे पाण्यासारखे शुद्ध आणि निर्मळ असतात. साधकाला संत रुपी सागरात विहरता आल्याससंत दर्शनाची विलक्षण अनुभूती प्राप्त होते. आरसा स्वच्छ असेल तर त्यात त बिंब प प्रतिबिंबाच्या स्वरूपात जसेच्या तसे उमटते. त्याप्रमाणे अंतकरण शुद्ध असल्यास आत्मस्वरूपाची ओळख होते.असे महाराज म्हणाले.संतांना ओळखण्यासाठी प्रथम त्यांना ऐकावे लागते. त्याशिवाय संत दर्शनाची तळमळ लागत नाही. संत संगती हवी. पण त्यांना ऐकणे त्यांना बघणे त्यांचे वर्णन करता येणे या प्रक्रियेतून संतां जवळ जाता येईल व या संत सहवासातूनच संत दर्शनाचे परम सुख प्राप्त होईल.जे आपल्याजवळच आहे त्या वस्तू हरवल्याचा भास निर्माण होतो. याचा अर्थ आपला मार्ग कुठेतरी चुकतो आहे. का कुठे कसे केव्हा या उत्तराच्या शोधात आपण न जाता संत सहवासातून 'तैसेची पहावे'हा अनुभव येतो. जे हरवलेच नाही याची जाणीव संत दर्शनाने होते. सुखरूप असूनही सुखाची आशा करणे हा विक्षेप आहे.

## मधमाश्यांच्या हल्ल्यात महिला गंभीर जखमी; उपचारादरम्यान मृत्यू

**■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)**:

जिल्ह्यातील बाशीटाकळी तालुक्यातील काजळेश्वर येथील शेतात एका कार्यक्रम दरम्यान मधम ाशांनी अचानक हल्ला केल्याने तीस वर्षीय विवाहित महिलेचा उपचार दरम्यान दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आज घडली. रेशमा पवार असे मृत महिलेचे नाव आहे.पवार कुटुंब आज त्यांच्या काजलेश्वर म धील शेतात पुजे करिता गेले होते. काजळेश्वर शेत शिवारात हरभरा काढण्याआधी पूजेच्या दरम्यान अगरबत्तीचा धूर उडाल्याने शेजारी असलेल्या झाडावर बसलेले आग्या मोहाचे पोळ उठल्याने मधमाशांनी हल्ला केला. या हल्ल्यात रेशमा पवार गंभीर जखमी झाल्याने त्यांना अकोला येथे रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पती आणि दोन लहान मुली आहे.

## संजय धोत्रेंचा वाढदिवस सामाजिक, समर्पण, समरसता दायित्व दिवस म्हणून होणार साजरा



**■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)**:

विदर्भाच्या विकासासाठी सदैव तत्पर राहणारे शेतकरी, कामगार, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या सामाजिक क्षेत्राच्या माध्यमातून कार्यकरणारे अजातशत्रू माजी केंद्रीयमंत्री संजय धोत्रे यांचा वाढदिवस जिल्ह्यात सामाजिक, समर्पण, समरसता दायित्व दिवस म्हणून साजरा होणार असून, यानिमित्ताने समाजोपयोगी कार्यक्रम रक्तदान, साफसफाई, मातृशक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध कार्यक्रम होणार असून, या निमित्ताने जिल्हाभर २५० ठिकाणी कार्यक्रम होणार आहेत. भाजपा महिला आघाडी, अल्पसंख्याक आघाडी, शेतकरी आघाडी, युवामोर्चा, ओबीसी, शेतकरी, अनु. जाती, अनु. जमातीच्या वतीने वेगवेगळे कार्यक्रमहोणार आहेत. समाजाला समर्पण दिवस म्हणून या दिवसाला महत्त्व असून, सातत्याने जनतेच्या सुखदुः खात सहभागी होण्याची त्यांची परंपरा कायम ठेवण्यासाठी माजी खासदार व केंद्रीय मंत्री संजय धोत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त धार्मिक, आदिवासी क्षेत्र अशा वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रम होणार असल्याची माहितीभाजपा जिल्हा सरचिटणीस माधव मानकर यांनी दिली. भाजपा प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, खा. अनुप धोत्रे, आ. प्रकाश भारसाकळे, आ. वसंत खंडेलवाल, आ. हरीश पिंपळे, किशोर पाटील, तेजराव थोरात, जयंतमसने आदींच्या नेतृत्वात कार्यक्रम होणार आहेत.

# सज्जन अखेर दुर्जन!

दिल्लीतील १९८४ च्या शीख विरोधी दंगली प्रकरणात मंगळवारी काँग्रेसचे माजी खासदार सज्जन कुमार यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. राऊस अव्हेन्यू न्यायालयाच्या विशेष न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी दुपारी २ नंतर निकाल दिला. न्यायालयाने २१ फेब्रुवारी रोजी शिक्षेवरील निर्णय राखून ठेवला होता. पीडितेच्या बाजूने सज्जन कुमारला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली होती. १२ फेब्रुवारी रोजी सज्जन कुमारला दोषी ठरवण्यात आले. हे प्रकरण दंगलीच्या वेळी सरस्वती विहारमध्ये जसवंत सिंग आणि त्यांचा मुलगा तरुणदीप सिंग यांच्या हत्येशी संबंधित आहे.

---

या काळात सज्जन हे बाह्य दिल्ली लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे खासदार होते. ते सध्या दंगलीच्या दुसऱ्या एका प्रकरणात तिहार तुरुंगात आहे आणि जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. सज्जन कुमारविरुद्ध दंगल, खून आणि दरोडा या आरोपाखाली भारतीय दंड संहितेच्या कलम १४७, १४९, १४८, ३०२, ३०८, ३२३, ३९५, ३९७, ४२७, ४३६, ४४० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

**३ प्रकरणे... १ मध्ये निर्दोष, २ मध्ये दोषी**

दिल्ली कॅन्टमधील पालम कॉलनीमध्ये ५ शिखांच्या हत्येनंतर गुरुद्वारा जाळण्यात आला. या प्रकरणात सज्जन कुमार दोषी आढळले. १७ डिसेंबर २०१८ रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

सप्टेंबर २०२३ रोजी, दिल्लीतील सुलतानपुरी येथे झालेल्या ३ शिखांच्या हत्येप्रकरणी राऊस अव्हेन्यू न्यायालयाने त्यांना निर्दोष मुक्त केले. दंगलीत सीबीआयच्या प्रमुख साक्षीदार चाम कौर यांनी सज्जन जमावाला भडकावत असल्याचा आरोप केला होता.

१ नोव्हेंबर १९८४ रोजी सरस्वती विहारमध्ये सरदार जसवंत सिंग आणि त्यांचा मुलगा तरुणदीप सिंग यांची हत्या करण्यात आली. दंगलखोरांनी लोखंडी रॉड आणि काठ्यांनी हल्ला केला. यानंतर दोन्ही शिखांना जिवंत जाळण्यात आले. १२ फेब्रुवारी २०२५ रोजी दोषी ठरवण्यात आले. २५ फेब्रुवारी रोजी त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. १९८४ मध्ये माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर शीखबहुल भागात दंगली झाल्या. यामध्ये हजारो लोक मारले गेले.

**दिल्ली सरकार अपील करणार**

शीख दंगलींच्या चौकशीसाठी स्थापन केलेल्या नानावटी आयोगाच्या अहवालानुसार, एकट्या दिल्लीत ५८७ गुन्हे दाखल झाले होते, ज्यामध्ये २७३३ लोक मारले गेले होते. एकूण प्रकरणांपैकी सुमारे २४० प्रकरणे बंद करण्यात आली तर २५० प्रकरणांमध्ये आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी दिल्ली सरकारने सर्वोच्च न्यायालयात सांगितले की ते ६ शीख दंगली प्रकरणांमधील निर्दोष सुटलेल्या आरोपींविरुद्ध याचिका दाखल करेल.






**काय घडले आणि केव्हा...**

३१ ऑक्टोबर १९८४ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या झाली. दुसऱ्या दिवशी म्हणजे १ नोव्हेंबर रोजी दिल्लीसह देशाच्या अनेक भागात शीखविरोधी दंगली उसळल्या.

पीटीआयच्या मते, एकट्या दिल्लीत सुमारे २७०० लोकांचा मृत्यू झाला. देशभरातील मृतांची संख्या ३,५०० च्या जवळपास होती. मे २००० मध्ये, दंगलींच्या चौकशीसाठी जीटी नानावटी आयोगाची स्थापना करण्यात आली. २४ ऑक्टोबर २००५ रोजी नानावटी आयोगाच्या शिफारशीवरून सीबीआयने गुन्हा दाखल केला.

१ फेब्रुवारी २०१० रोजी, ट्रायल कोटाने काँग्रेस नेते सज्जन कुमार, बलवान खोकर, महेंद्र यादव, कॅप्टन भागमल, गिरधारी लाल, किशन खोकर, महा सिंह आणि संतोष राणी यांना समन्स जारी केले.३० एप्रिल २०१३ रोजी न्यायालयाने सज्जन कुमारला निर्दोष सोडले.

याविरुद्ध सीबीआयने १९ जुलै २०१३ रोजी उच्च न्यायालयात अपील केले. २२ जुलै २०१३ रोजी उच्च न्यायालयाने सज्जन कुमार यांना नोटीस बजावली. १७ डिसेंबर २०१८ रोजी उच्च न्यायालयाने सज्जन कुमारला पाच शिखांच्या हत्येच्या प्रकरणात दोषी ठरवले आणि जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

दंगलीनंतर २१ वर्षांनी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी संसदेत माफी मागितली. ते म्हणाले होते की जे काही घडले त्यामुळे त्यांचे डोके लज्जेने झुकते. देशाच्या इतिहासात कदाचित हा सर्वाधिक काळ चाललेला खटला असावा.

●●●●●●

# 'हर हर महादेव'चे सामर्थ्य!



२६ फेब्रुवारी म्हणजे महाशिवरात्रीच्या दिनी प्रयागराज येथील महाकुंभात शेवटचे अमृत स्नान पार पडणार आहे. त्रिमूर्तीपैकी एक भगवान शिव हिंदूंचे प्रमुख श्रद्धास्थान आहे. सृष्टीचे निर्माणकर्ता श्री ब्रह्मदेव, पालनकर्ता श्री विष्णुदेव आणि संहारकर्ता श्री महादेव आहेत. म्हणूनच मृत्यू किंवा मोक्ष यावर श्री महादेवाचा अंकुश आहे, असे म्हटले जाते.

गतजन्मातील पापकर्मांमुळे आपणास या जन्मात प्रारब्ध म्हणून मानसिक आणि शारीरिक व्याधी भोगाव्या लागतात या सर्वांपासून मुक्ती देण्याचे कार्य श्री महादेव करतात, अशी अनेकांची धारणा आहे. शिवाचे भारतासह जगभरात कोट्यवधी भक्त आहेत. शिवाच्या नियमित उपासनेने भय, दुःख, रोग,दारिद्रय नाहीसे होऊन जीवनात सुख शांती आणि समृद्धी लाभते असा श्रद्धाळुंचा समज आहे. शिवाचे व्रत म्हणून अनेक जण सोळा सोमवार करतात, श्रावण महिन्यात सोमवारी निराहार राहतात.

महाशिवरात्रीचे व्रत करतात. शिवाचे अघोरी उपासकही आहेत जे स्मशानात जाऊन शिवाची उपासना करतात. या सर्वांचे दर्शन आपल्याला यंदाच्या महाकुंभाच्या निमित्ताने झाले. 'ओम नमः शिवाय' हा शिवाचा मंत्र आहे तर 'हर हर महादेव' हा जयघोष आहे. ज्योतिर्लिंगांच्या स्थानी किंवा शिवाच्या मंदिरांत गेल्यावर 'हर हर महादेव' चा जयघोष आपल्याला हमखास ऐकायला मिळतो. 'हर हर महादेव' या जयघोषात प्रचंड सामर्थ्य आहे, त्यामुळेच हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी सुद्धा स्वराजाच्या सैन्याचा म्हणजेच मावळ्यांचा जयघोष 'हर हर महादेव'च ठेवला होता. या जयघोषाची त्यावेळेस प्रचंड दहशत होती. 'हर हर महादेव'चा घोष कानी पडताच स्वराज्याचे शत्रू यवन थरथर कापू लागत. याच 'हर हर महादेव' घोषाचे महत्व आता विज्ञानाच्या स्तरावही सिद्ध झाले आहे.

वाराणसीतील आयएमएस बीएचयूच्या फॅकल्टी ऑफ डेंटल सायन्सचे डॉक्टर तोंडाच्या कर्करोगाच्या रुग्णांवर आगळ्या पद्धतीने उपचार करत आहेत. या ठिकाणी शस्त्रक्रिया झाल्यानंतर रुग्णांना दोन्ही हात वर करून 'हर हर महादेव' चा जयघोष करण्यास सांगितले जाते. या अनोख्या उपचारामुळे रुग्णांना अवघ्या दोन महिन्यांत आराम मिळतो.

डॉक्टरांनी तोंडावर शस्त्रक्रिया करताना रुग्णांच्या छातीचे काही स्नायू कापून त्यांचे रुग्णांच्या शस्त्रक्रिया केलेल्या भागावर रोपण केले असता रुग्णांच्या हाताची आणि खांद्यांची हालचाल पूर्णतः थांबल्याचे लक्षात आले. ही हालचाल पूर्ववत होण्यासाठी फिजिओथेरपीचे नेहमीचे उपचार करूनही विशेष फरक पडला नाही; मात्र याच रुग्णांनी 'हर हर महादेव'चा जयघोष करत हात वर करण्याचा प्रयत्न केल्यावर हळूहळू अवयवांची हालचाल होऊ लागली आणि रुग्णांनाही आराम मिळू लागला.

या आगळ्या वेगळ्या प्रयोगाची कर्करोगाच्या ३०० हुन अधिक रुग्णांवर चाचणी करण्यात आली, त्यापैकी ८० टक्याहुन अधिक लोकांना विस्मयकारक आराम मिळाला, ज्या रुग्णांनी प्रतिदिन गांभीर्याने ही थेरेपी केली त्यांना दोन अडीच महिन्यांत त्यांचे हात पूर्णतः वर करता येऊ लागले. फिजिओथेरपीवर लाखो रुपए खर्च करूनही जो परिणाम मिळू शकला नाही तो केवळ 'हर हर महादेव'च्या जयघोषाने अवघ्या दोन महिन्यांत मिळाला.

येथील विद्याशाखा प्रमुख एच. सी. बरनवाल यांनी सांगितले कि, वैद्यकीय शास्त्रात प्रथमच 'हर हर महादेव' ही थेरपी म्हणून जगभरात स्वीकारली गेली आहे. विद्याशाखेचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. अखिलेश सिंह यांनी सांगितले कि 'हर हर महादेव'च्या घोषाने आध्यात्मिक शक्ती निर्माण होते जिचा आध्यात्मिक स्तरावर लाभ, तर होतोच शिवाय ही एक अशी फिजिओथेरपी आहे ज्यामध्ये अधिक श्रम करावे लागत नाहीत.

काशीच्या लोकांना नेहमीच्या बोलण्यात 'हर हर महादेव'चा जयघोष करण्याची सवय आहे; मात्र ही सवय म्हणजे सर्वात अधिक परिणामकारक फिजिओथरपी आहे. हे त्यांनाही माहीत नाही. छत्रपती शिवरायांनी मूठभर मावळ्यांच्या बळावर पाच पातशाह्यांना धूळ चारली. हजारो मुघल सैन्यावर काही शेकडा मावळे तुटून पडत आणि त्यांच्यावर विजयही मिळवत. त्यांना ही शक्ती आणि सामर्थ्य देण्याचे काम 'हर हर महादेवचा' जयघोष करत असे हे आता लक्षात येते.

भगवंताच्या नामामध्ये किती सामर्थ्य आहे हे आता विज्ञानाच्या पातळीवरही सिद्ध होऊ लागले आहे. कलियुगामध्ये समस्त संतांनीही नामजपाचे महत्व विशद केले आहे. नियमित नामजपाने मनाची शक्ती वाढून मन एकाग्र होते, विद्यार्थ्यांना अभ्यासात मन एकाग्र करण्यासाठी नामजप एक प्रभावी उपाय आहे. मनावरील ताण नाहीसा करण्यासाठीही नियमित नामजप गुणकारी आहे. जिथे जिथे देवतेचे नाम आहे तिथे त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि शक्ती एकवटलेली असते असे धर्मशास्त्र सांगते त्यामुळे नामजपाच्या आध्यात्मिक स्तरावर लाभ तर होतोच शिवाय मानसिक स्तरावरही होतो. ज्या नामाने दरोडेखोर वाल्याचा वाल्मिकी झाला त्या नामापुढे आपले साधे सुधे आजार आणि रोग एव्हढे मोठे आहेत का ?

---

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई**
**९६६४५५९७८०**

●●●●●●

# त्रिभाषेवरून केंद्र आणि राज्य सरकारमध्ये वाद

काही महिन्यांपूर्वीच केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात दर्जा दिला. मराठीचा गुणगौरव करणारे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नुकतेच राजधानी दिल्ली येथे साजरे झाले. एकीकडे मराठीचा हा असा डंका वाजत असताना तिकडे दक्षिणेतील राज्यात भाषेवरून नवा वाद उफाळला आहे .तामिळनाडूमधील त्रिभाषिक वादावर, मक्कल निधी मय्यम पक्षाचे प्रमुख कमल हासन म्हणाले की, तमिळ भाषा ही त्यांची सांस्कृतिक ओळख आहे. यासाठी लोकांनी आपले प्राण गमावलत. त्यांच्याशी खेळू नका, असा इशारा कमल हासन यांनी दिला आहे.

---

अभिनेता-राजकारणी बनलेले हासन शुक्रवारी चेन्नई येथे त्यांच्या पक्षाच्या आठव्या स्थापना दिनानिमित्त कार्यकर्त्यांना संबोधित करत होते. हासन म्हणाले की भाषेच्या मुद्द्यांना हलक्यात घेऊ नये. तामिळनाडूच्या मुलांनाही माहित आहे की त्यांना कोणती भाषा हवी आहे. त्यांना स्वतःची भाषा निवडण्याची समज आहे. केंद्र आणि राज्य यांच्यात सुरू असलेल्या त्रिभाषिक वादाबाबत हासन यांनी हे विधान केले आहे.

२०१९ मध्ये लागू करण्यात आलेल्या नवीन शिक्षण धोरणानुसार, प्रत्येक राज्यातील विद्यार्थ्यांना तीन भाषा शिकाव्या लागतील. हिंदी भाषिक नसलेल्या राज्यांमध्ये, हिंदी ही दुसरी भाषा म्हणून शिकवली जाऊ शकते. तामिळनाडूमध्ये नेहमीच द्विभाषिक धोरण राहिले आहे. येथील शाळांमध्ये तमिळ आणि इंग्रजी शिकवले जाते.

**तामिळनाडूमध्ये भाषेचा वाद...**

२१ फेब्रुवारी २०२५ः शिक्षणमंत्री म्हणाले- नवीन शिक्षण धोरणात भाषिक स्वातंत्र्य

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शुक्रवारी तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांना पत्र लिहिले. राज्यात होत असलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरणा (एनईपी) विरोधात होणा?या निदर्शनांवर त्यांनी टीका केली.

त्यांनी लिहिले, 'कोणतीही भाषा लादण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. परंतु परदेशी भाषांवर जास्त अवलंबून राहिल्याने स्वतःची भाषा मर्यादित होते. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (ठएढ) हे दुरुस्त करण्याचा प्रयत्न करत आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण भाषिक स्वातंत्र्याचे समर्थन करते आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीची भाषा शिकत राहावी याची खात्री करते.

यापूर्वी, १५ फेब्रुवारी रोजी, धर्मेंद्र प्रधान यांनी वाराणसी येथील एका कार्यक्रमात तामिळनाडू राज्य सरकारवर राजकीय हितसंबंध जोपासल्याचा आरोप केला होता.

यानंतर तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांनी म्हटले होते की तमिळ लोक ब्लॅकमेलिंग किंवा धमक्या सहन करणार नाहीत. जर राज्याला समग्र शिक्षणासाठी निधी नाकारला गेला, तर केंद्राला तमिळ लोकांकडून त्यांच्या 'तमिळ' अद्वितीय स्वभावामुळे तीव्र विरोधाचा सामना करावा लागेल.

तामिळनाडूचे उपमुख्यमंत्री उदयनिधी यांनी १८ फेब्रुवारी रोजी म्हटले होते की, हिंदी स्वीकारणारी राज्ये त्यांची मातृभाषा गमावतात. केंद्राने भाषायुद्ध सुरू करू नये. या विधानानंतर, केंद्राच्या त्रिभाषा धोरणाबाबत



आणि हिंदी लादण्यावरून राज्यातील सत्ताधारी द्रमुक आणि भाजपमधील वाद अधिक तीव्र झाला. ते म्हणाले होते की धर्मेंद्र प्रधान यांनी आम्हाला उघडपणे धमकी दिली आहे की जर आम्ही त्रिभाषा सूत्र स्वीकारले तरच निधी जारी केला जाईल. पण आम्ही तुम्हाला भीक मागत नाही आहोत.

तमिळनाडू भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष के अन्नामलाई यांनी २१ फेब्रुवारी रोजी सरकारी शाळांमध्ये सर्वेक्षण करण्याची मागणी केली. यावरून कोणता विद्यार्थी कोणती भाषा शिकू इच्छितो हे स्पष्ट होईल. निकालांच्या आधारे त्या भाषांच्या शिक्षकांची नियुक्ती करावी.

दरम्यान, भाजपने राज्यात त्रिभाषेला प्रोत्साहन देण्यासाठी मोहीम तीव्र केली आहे. पुढील वर्षी होणाऱ्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी भाजप १ मार्चपासून प्रचार सुरू करण्याची तयारी करत आहे. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी पक्षाचे राज्य युनिट प्रमुख के अन्नामलाई यांच्या देखरेखीखाली ही नवीन मोहीम सुरू केली जाईल. त्यांनी द्रमुकवर १९६० च्या जुन्या धोरणाला चिकटून राहण्याचा आरोप केला.

प्राथमिक वर्गात (इयत्ता पहिली ते पाचवी) शिक्षण मातृभाषेत किंवा स्थानिक भाषेत करावे अशी शिफारस केली जाते. त्याच वेळी, मध्यम वर्गात (इयत्ता 6 वी ते 10 वी) 3 भाषा शिकणे अनिवार्य आहे. हिंदी नसलेल्या राज्यात ती इंग्रजी किंवा आधुनिक भारतीय भाषा असेल. जर शाळेची इच्छा असेल तर ते माध्यमिक विभागात म्हणजेच अकरावी आणि बारावीमध्ये परदेशी भाषा हा पर्याय देखील देऊ शकते. पाचवीपर्यंत आणि शक्य असेल तिथे आठवीपर्यंत मातृभाषा, स्थानिक किंवा प्रादेशिक भाषेत शिक्षण घेण्यावर भर दिला जातो. त्याच वेळी, हिंदी नसलेल्या राज्यांमध्ये, हिंदी ही दुसरी भाषा म्हणून शिकवली जाऊ शकते. राज्ये आणि शाळांना कोणत्या तीन भाषा शिकवायच्या हे ठरवण्याचे स्वातंत्र्य आहे. कोणत्याही भाषेची सक्ती करण्याची तरतूद नाही.

●●●●●●

# महाशिवरात्री व्रत!

महाशिवरात्री हे हिंदू धमार्तील एक महत्त्वपूर्ण व्रत असून, ते भगवान शिवाला समर्पित आहे. धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून याला विशेष महत्त्व आहे. या दिवशी भक्त उपवास करतात, रात्रभर जागरण करतात आणि भगवान शिवाला जलाभिषेक आणि रुद्राभिषेक करून त्यांची कृपा प्राप्त करतात.

*मृत्युञ्जयाय रुद्राय नीलकण्ठाय शम्भवे?।*
*अमृतेशाय शर्वाय महादेवाय ते नमः ॥*

अर्थ : ज्याने मृत्यूवर विजय प्राप्त केला आहे, असुरांना ज्याची भीती वाटते, ज्याचा कंठ निळा आहे, जो कल्याणकारी, अमृताचा स्वामी आणि मंगलमय आहे, अशा सर्व देवतांमध्ये श्रेष्ठ असलेल्या भगवान शंकराला मी वंदन करतो.

**प्रस्तावना :** सनातन हिंदू धर्मात उपासनेच्या विविध पद्धती सांगितल्या आहेत. कारण प्रत्येक जीव आपला स्वभाव आणि भक्तीच्या प्रकारानुसार ईश्वराची आराधना करून ईश्र्वराशी एकरूप होऊ शकतो. भगवान शिवांची उपासना विविध प्रकारे केली जाते. विशेषतः, शिवोपासनेसाठी अनेक व्रत सांगितली गेली आहेत, जसे की प्रदोष व्रत, सोळा सोमवार व्रत, हरितालिका व्रत इत्यादी. यासह श्रावण मास शिवभक्तांसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो. सोमवार आणि शिवरात्री हे दिवस शिवोपासनेसाठी अत्यंत शुभ मानले जातात. महाशिवरात्री व्रत आणि भगवान शिवाशी संबंधित विविध प्रतीक व त्यांचे महत्त्व जाणून घेऊया.

**महाशिवरात्री का साजरी करतात ?**

महाशिवरात्रीच्या रात्री भगवान शिव एक प्रहर विश्रांती घेतात. दक्षिण भारत आणि महाराष्ट्रात महाशिवरात्री माघ कृष्ण चतुर्दशीला तर उत्तर भारतात फाल्गुन कृष्ण चतुर्दशीला साजरी केली जाते. यावर्षी महाशिवरात्री 26 फेब्रुवारी 2025 रोजी आहे.

**महाशिवरात्रीचे महत्त्व काय आहे ?**

महाशिवरात्रीच्या दिवशी भगवान शिव प्रदोष काळात समाधी अवस्थेत जातात. स्वर्गलोकातील एका दिवसाच्या तुलनेत पृथ्वीवरील एक वर्ष असते. या दिवशी शिवतत्त्व इतर दिवसांपेक्षा 1000 पट जास्त कार्यरत असते. त्यामुळे उपवास, पूजा आणि जागरण या महाशिवरात्रि व्रताच्या तीन अंगांचे पालन केल्यास भक्तांना विशेष लाभ होतो.

भगवान शिवाची वैशिष्ट्ये आणि त्यांचे प्रतीकात्मक अर्थ १. डमरू : भगवान शिवाच्या



डमरूच्या ५२ नादांपासून ५२ ध्वनी आणि बीजमंत्र निर्माण झाले, ज्यापासून संपूर्ण ब्रह्मांडाची निर्मिती झाली. डमरू नादयोग आणि आध्यात्मिक ज्ञानाचे प्रतीक आहे.

२. त्रिशूल : शिवाचा त्रिशूल सृष्टी, पालन आणि संहार या तीन शक्तींचे प्रतीक आहे. तसेच भूत, भविष्य आणि वर्तमान या तीन कालखंडांचेही द्योतक आहे.

३. नाग : भगवान शिव वासुकी नाग गळ्यात धारण करतात, जो कालचक्राचे प्रतीक आहे. नवनाथांची उत्पत्तीही नवनारायण नागांपासून झाली असे मानले जाते.

४. भस्म : भगवान शिव संपूर्ण शरीरावर भस्म लावतात, जे त्यांचे वैराग्य, संहार आणि पुनर्जन्माचे चक्र दर्शवते.

५. रुद्राक्ष : रुद्राक्ष शिवाच्या अश्रूंमधून उत्पन्न झाला आहे, असे मानले जाते. रुद्राक्ष धारण केल्याने आध्यात्मिक ऊर्जा आणि मानसिक शांतता प्राप्त होते.

६. व्याघ्रांबर (बाघाची कातडी) :
शिव व्याघ्रांबर परिधान करतात, जे रज-तमगुणांवर विजय मिळवल्याचे प्रतीक आहे.

७. तांडव नृत्य :
भगवान शिव नटराज रूपात तांडव नृत्य करतात. त्यांच्या नृत्यात संपूर्ण ब्रह्मांडाच्या निर्मिती आणि संहाराची प्रक्रिया सामावलेली आहे.

**महाशिवरात्रीला करावयाच्या गोष्टी :**

१. भगवान शिवाचे नामस्मरण करा.
२. शिवलिंगावर अभिषेक करा.
३. श्वेत अक्षत, श्वेत पुष्प, बेलपत्र अर्पण करून पूजा करा.
४. शिवमंदिरात जाऊन भगवान शिवाचे दर्शन घ्या.

या सर्व गोष्टींमधून भगवान शिवाच्या उपासनेचे महत्त्व लक्षात येते. भगवान शिव उत्तर दिशेला असलेल्या कैलास पर्वतावर ध्यान करतात आणि संपूर्ण जगाचे कल्याण करतात. ते स्वतः साधना करतात आणि भक्तांची आध्यात्मिक उन्नती घडवतात.

भगवान शिवांची ईश्वरभक्ती सर्व जीवांमध्ये निर्माण होवो आणि लवकरच ईश्वरी राज्य पुनर्स्थापित होवो, हीच भगवान शिवांच्या चरणी प्रार्थना !

---

**सौ. अंजली पाध्ये**
**सनातन संस्था, नागपूर.**
**9975536906**

■ ■ ■

**वाचक लिहितात**

**ॐ कपड्यांवर नकोच!**

हल्ली ॐ नमः शिवाय । हा मंत्रजप लिहिलेले स्त्री आणि पुरुषांचे सदरे, शर्ट्स तयार कपड्यांच्या दुकानात विक्रीला ठेवलेले पाहायला मिळतात. महाशिवरात्र आणि श्रावण महिन्याच्या दरम्यान ऑनलाईन संकेतस्थळांवरसुद्धा अशा कपड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. बारा ज्योतिर्लिंग तसेच भगवान शिवाची पुरातन मंदिरे आहेत अशा ठिकाणी या स्वरूपाच्या कपड्यांचे स्टॉल्स पाहायला मिळतात. महाशिवरात्रीनिमित्त प्राचीन शिवमंदिराच्या ठिकाणी जत्रांमध्ये 'ॐ नमः शिवाय ।' मंत्रजप प्रिंट केलेले कपडे विक्रीसाठी ठेवलेले दिसून येतात, ज्यांना तरुणवर्गाकडून अधिक पसंती दिली जाते.

'ॐ नमः शिवाय ।' हा भगवान शिवाचा मंत्रजप असून याच्या नियमित स्मरणाने शिव प्रसन्न होऊन आपली मनोकामना पूर्ण करतो असे म्हटले जाते. यामध्ये ओम हा बीजमंत्र असल्याने या मंत्रात शक्तीही सामावलेली असते. त्यामुळे तो श्रद्धेने स्मरावा असे धर्मशास्त्र सांगते. धर्मशास्त्रानुसार ज्या ठिकाणी देवतेचे नाम अथवा प्रतिमा असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि त्या देवतेची शक्ती कार्यरत असते. ॐ नमः शिवाय ' सारख्या या शक्तिशाली मंत्राचा हल्ली कपड्यांवर होत असलेला सुमार वापर मनाला खटकणारा आहे.

मंत्रजप छापलेले कपडे घालून आपण आवश्यक ती शुचिर्भूतता पाळतो का? अशा प्रकारचे कपडे परिधान करून आपण कोणत्याही अपवित्र स्थळी जात असू, मद्यपान, धूम्रपान करत असू, मुक्तपणे वावरत असू तर तो प्रत्यक्ष शिवाचाच अवमान आहे. घामामुळे घातलेल्या कपड्यांना दुर्गंध येऊ लागतो. असे कपडे अन्य कपड्यांसोबत धुतांनाही आपण विशेष काळजी घेत नाही. एकीकडे आपली शिवभक्ती दाखवण्यासाठी अशा प्रकारचे कपडे घालायचे आणि दुसरीकडे प्रत्यक्ष शिवाचाच अवमान करायचा अशाने शिवाची कृपा आपल्यावर होईल का? भक्ती ही मनापासून करावी, त्यासाठी हिंदू धर्मात अनेक मार्ग सांगण्यात आले आहेत. भगवान शिवाचा मंत्रजप छापलेले कपडे विकत घेणे आणि ते परिधान टाळायला हवे. त्याऐवजी ॐ नमः शिवाय हा मंत्रजप श्रावणात अधिकाधिक करायला हवा.

■ **सौ. मोक्षदा घाणेकर**
**काळाचौकी, मुंबई .**

**कापूर आणि भस्म यांचे महत्त्व**

आज महाशिवरात्री आहे. भगवान शिव रात्रीच्या एका प्रहरी विश्रांती घेतात. त्या प्रहराला, म्हणजे शंकराच्या विश्रांती घेण्याच्या काळाला महाशिवरात्री असे म्हणतात. महाशिवरात्रीच्या दिवशी भगवान शिवाची पूजा विशेष विधीने केली जाते. या पूजेत भस्म आणि कापूर यांना महत्त्वाचे स्थान आहे.

भस्म आणि कापूर यामध्ये लयाशी संबंधित शक्ती अधिक प्रमाणात कार्यरत असते. भगवान शिव हे लयाचे देवता असल्यामुळे त्यांच्या उपासनेत या दोन्ही घटकांचा उपयोग केला जातो. शिवपिंडी किंवा शिवमूर्तीवर भस्माचे तीन आडवे पट्टे लावले जातात. यामुळे वायू आणि आकाश या स्तरांवरील निर्गुण शिवतत्त्व लवकर आकृष्ट होते.

भस्माचे पट्टे लावल्यामुळे मूर्ती किंवा पिंडी यांमध्ये जागृत झालेले शिवतत्त्व वातावरणात लवकर मिसळून सर्वत्र पसरते. शिवपिंडीला भस्म लावल्यामुळे पिंडीतील शक्तीचा लाभ भाविकांना होतो. तसेच, शिवतत्त्व वातावरणात पसरल्याने संपूर्ण परिसर सात्विक आणि पवित्र बनते. त्यामुळे महाशिवरात्रीच्या दिवशी शिवपूजेत भस्म आणि कापूर यांचा वापर करणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

■ **सौ. वर्षा आवदे**
**नागपूर.**



# दिवसभर फ्रेश, एनर्जेटिक राहायचे? या ड्रिंक्सचे करा सेवन

आजकालच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे अनेकांना त्यांच्या आरोग्याची व्यवस्थित काळजी घेता येत नाही. लोकं त्यांच्या खाण्या पिण्याच्या सवयींबद्दल निष्काळजी राहू लागले आहेत. व्यस्त जीवनशैलीमुळे जंक फूडच्या सेवनाचे प्रमाण वाढले आहे. जंक फूडचे जास्त प्रमाणात सेवन केल्यामुळे आरोग्यासंबंधित अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. जंक फूडमध्ये पोषक तत्वांची कमी असते ज्यामुळे शरीराला योग्य पोषण मिळत नाही आणि दिवसभराच्या धावपळीमुळे आणि तणावामुळे शरीरातील उर्जा कमी होण्यास मदत होते. त्यामुळे अशक्तपणा आणि चक्कर येणे यासारख्या समस्या उद्भवतात.

ज्या दिवशी अशक्तपणा जाणवतो त्याचा अर्थ तुमच्या खाण्या पिण्याच्या सवयींमुळे काहीतरी चुकत आहे आणि आरोग्याला योग्य पोषण मिळत नाही. अशा परिस्थितीमध्ये आहोराची विशेष काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

आहारामध्ये भरपूर प्रमाणात प्रोटिन, फायबर, मॅग्नेशियम आणि हेल्दी फॅट्स असतात ज्यामुळे आरोग्याला योग्य पोषण मिळण्यास मदत होते. शरीरत उर्जा टिकवून ठेवण्यासाठी या पदार्थांचे सेवन करणे फायदेशीर ठरेल. आहारामध्ये काही विशेष पेयांचे सेवन केल्यामुळे अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात.

**नारळ पाणी :** नारळ पाणीमध्ये भरपूर प्रमाणात पोटॅशियम, कॅल्शियम, मॅगनीज, अँटिऑक्सिडंट्स आणि अमीनो ॲसिड असतात ज्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. नारळ पाण्याचे सेवन केल्यामुळे शरीराला योग्य प्रमाणात पोषक तत्वं मिळतात ज्यामुळे शरीराला योग्य प्रमाणात उर्जा मिळण्यास मदत होते. नारळ पाण्याचे नियमित सेवन केल्यामुळे गर्मीत होणाऱ्या डिहाड्रेशन पासून तुम्हाला आराम मिळतो.

**आवळा बीट आणि गाजर ज्यूस :** आवळा बीट आणि गाजरचा ज्यूस प्यायल्यामुळे शरीराला उर्जा मिळण्यास मदत होते. गाजरमधील जीवनसत्त्वे, फायबर आणि प्रथिने शरीराला पोषण देण्यास मदत करतात.

बीटमध्ये नैसर्गिक रसायनिक नायट्रेटचा चांगला स्त्रोत आहे ज्यामुळे संपूर्ण शरीरातील रक्तप्रवाह सुधारण्यास मदत होते. या रसाच्या सेवनामुळे शरीरातील रक्तदाब नियंत्रित राहाण्यास मदत होते. आवळा शरीरातील रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यास मदत करते.

**ड्रायफ्रुट शेक :** ड्रायफ्रूट शेकमध्ये असलेले कार्बोहायड्रेट्स आणि नैसर्गिक साखर तुमच्या शरीराला पुरेशी ऊर्जा मिळण्यास मदत होते. याशिवाय, जर बद्धकोष्ठता, गॅस आणि अपचन यासारख्या समस्या असतील तर त्या दूर होण्यास मदत होते. ड्रायफ्रूट्समधील व्हिटॅमिन बी स्नायूंना उर्जा मिळण्यास मदत होते.

**मिक्स फळांचा ज्यूस :** मिक्स फळांमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, फॉलिक ॲसिड आणि फायबर आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असतात. मिक्स फळांचा ज्यूस प्यायल्यामुळे शरीरातील उर्जा टिकवून ठेवण्यास मदत होते. मिक्स फळांचे सेवन आरोग्यासह त्वचेसाठी देखील फायदेशीर ठरतो.

**ओट्स स्मूथी :** ओट्स आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरतात. ओट्सचे स्मूथी प्यायल्यामुळे शरीरातील वजन नियंत्रित ठेवण्यास आणि शरीराला उर्जा देण्यास मदत होते. ओट्सचे सेवन केल्यामुळे शरीरातील कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते.

■ ■ ■

**अशोकायन**
**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## ! शिव प्रार्थना !

ब्रम्हा विष्णू महेश
सृष्टी चक्राचे मुलाधार
निर्मिती पोषण संहार
करती जगाचे पालनहार ..

असुरत्वाचे वाढले प्राबल्य
कामातुरांनी घातले थैमान
त्रिनेत्रधारी विनविती महीला
भस्म करावे हे हैवान ..!

जगी नांदो सुख शांती
वैराग्य येऊ द्या शरीरी
परोपकारी वृत्तीचा संचार
होऊ द्या आमच्या अंतरी ..!

# नोटीसनंतर आता मनपा मालमत्तांना लावणार सील

■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी):
अकोला महापालिका प्रशासनाने बड्या थकबाकीदारांना कर भरण्यासाठी १५ दिवसांची अंतिम मुदत देण्यात आली होती. मात्र, अनेक मालमत्ताधारकांनी या नोटीसकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे आता १ मार्चपासून मनपा बड्या थकबाकीदारांची मालमत्ता अटॅच करणार आहे. त्यानंतरही कर न भरल्यास मालमत्ता सील करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे. कराच्या महापालिकेने मालमत्ता वसुलीसाठी २० जानेवारीपासून शास्ती अभय योजना सुरु केली आहे. गत ३४ दिवसांमध्ये मनपाच्या कर्मचाऱ्यांनी २० कोटींचा मालमत्ता कर वसूल केला आहे. त्यापूर्वी खासगी कंपनी स्वाती इंडस्ट्रिजने ३४ कोटी कर वसुली केली होती. चालू आर्थिक वर्षांत एकूण ५४ कोटींचा मालमत्ता कर वसूल झाला आहे. दरम्यान, चालू आर्थिक वर्षातील आता एक महिना शिल्लक राहिला असताना मनपासमोर सुमारे १४२ कोटींचा कर वसूल करण्याचे आव्हान असून १४२ कोटींचा कर वसूल करावा लागणार आहे. त्यामुळे आता महापालिकेने ५ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकांना नोटीसा पाठविण्यास सुरुवात केली आहे. महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाची चालू वार्षिक मागणी व मागील थकबाकी सुमारे १९६ कोटी रुपये होती. गतवर्षी ३१ डिसेंबर २०२४ पर्यत यापूर्वी नियुक्त स्वाती इंडस्ट्रीज या खासगी कंपनीने केवळ ३४ कोटी रुपयांची वसुली केली आहे.

# गावांच्या समृद्धीसाठी जलसंवर्धन आवश्यक : एसडीओ अनिरुद्ध बक्षी



■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी):
जलसंवर्धनातूनच सिंचन व कृषी उत्पादकता वाढेल. खेडीपाडी समृद्ध होतील. त्यामुळे गावोगाव पाणलोट व्यवस्थापन व्हावे, असे आवाहन बाळापूरचे उपविभागीय अधिकारी अनिरूद्ध बक्षी यांनी केले.श्री. बक्षी यांच्या हस्ते पाणलोट यात्रेचे पातूर तालुक्यातील पिंपरडोळी येथे सोमवारी स्वागत करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. सरपंच गंगासागर ताजने, अनिलबाबा देशमुख, नायब तहसीलदार श्री. तेलगोटे, राम ठोके, श्री. वानरे, बी. आर. इंगळे आदी उपस्थित होते.प्रारंभी जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून प्रभातफेरी काढण्यात आली. यानिमित्त निबंध व चित्रकला स्पर्धेतील गुणवंतांना बक्षीसवितरण झाले. रूक्मिणी स्वयंसहायता गट, वैष्णवी स्वयंसहायता गट, संघर्ष स्वयंसहायता गट यांचे स्टॉलही यात्रेनिमित्त लावण्यात आले. पथनाट्याद्वारे जनजागृती, वृक्षारोपण करण्यात आले. पाणलोट योद्धयांचा सत्कारही यावेळी झाला.

# महानगरात १४ व्या दिव्यांग क्रीडा स्पर्धेचे आयोजन

## मुकबधीर बांधवानी सहभागी होण्याचे आवाहन

■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी):
जिल्ह्यातील मूक व बधिर क्रीडा सांस्कृतिक मंडळ असो. च्या वतीने महानगरात १४ व्या मुकबधिर क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी दिनांक १ मार्च व रविवार दि २ मार्च रोजी सकाळी ९ वाजता वसंत देसाई स्टेडियम येथे दिव्यांग खेळाडूंच्या विविध क्रीडा स्पर्धा होणार आहेत. अकोला जिल्हा मुक बधिर क्रीडा संस्कृतिक मंडळ असो.च्या संयोजनाने आयोजित या १४ व्या महाराष्ट्र डेफ सेनीऑर स्पोर्ट्स चॅम्पियन शिप मध्ये जिल्ह्यातील मूक व बधिर महिला पुरुष वर्गाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन असो.चे चेअरमन पंकज जायले यांनी केले. या स्पर्धेच्या सफलतेसाठी असो. चे अध्यक्ष गुणवंत महल्ले, उपाध्यक्ष अश्विन कट्टा, सचिव अभय मुळे, सहसचिव प्रणय बाबर, कोषाध्यक्ष मधुर खंडेलवाल, सदस्य प्रतीक पनपालिया, तुषार रामटेके, विकी मलिये, आवेश अहमद, विनोद बनचरे, दीपक इंगळे, किशोर सोळुंके महेश पितळे,आकीब अहमद,वृषभ सोनवणे, मिलिंद, मुस्तफा, सोनु, धामिका सिरसाट,सोनु गवई,मिलिंद गोतरकर सल्लागार आसावारी मुळे, ऋषिकेश महल्ले आदीं मेहनत करीत आहेत.

# भागवत श्रवणाने वासनेची निवृत्ती : पु.गोपाल महाराज



**अकोला** : वासना मग ती कोणतीही असो ती मनुष्याच्या विनाशास कारणीभूत असते.पारमार्थिक विश्वात तर वासना ही नकोच.कारण ती प्रभू भक्तीत मोठा अडथळा ठरते. साधू,सत्संग व प्रभू स्मरणाने वासनेचा समूळ नाश होते म्हणून साधूचा सत्संग वा भगवंताचे स्मरण करण्याचा हितोपदेश वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांनी केला.

भागवत सेवा समिती व आशिष पवित्रकार मित्र मंडळाच्या वतीने गुरुवर्य संत वासुदेव महाराज यांच्या स्मरणार्थ व स्व बाबुराव पवित्रकार यांच्या स्मृतीत जवाहर नगर येथील छत्रपती राजे संभाजी पार्क येथे सुरू असलेल्या वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांच्या श्रीमद् भागवत कथेत त्यांनी कथेचे सहावे पुष्प गुंफले.ते पुढे म्हणाले,कोणत्याही विकाराला नष्ट करण्याचे सामर्थ्य केवळ साधू संतात आहे.सत्संग व मित आहार जेथे आहे तेथे विकार पोहोचू शकत नसल्याचे पु गोपाल महाराज यांनी सांगून राधा मंत्राने पण जीवाचा विकार नष्ट होत असल्याचे सांगितले.ते म्हणाले भजन हे प्रभूप्राप्ती साठी आवश्यक आहे भजनात हसता ही आले पाहिजे व रडता ही आले पाहिजे.या दोन्ही बाबी भक्तास प्रभू जवळ नेत असल्याचे त्यांनी यावेळी सांगून कृष्णभक्तीचे सार व कृष्ण लिलेची महीमा आपल्या संगीतमय कथेतून विशद करीत मान्यवरांच्या सामूहिक आरती ने या सत्राचे समापन केले.संचालन जीवन देशमुख यांनी केले.उद्या गुरुवार दि २७ फेब्रुवारी रोजी साय ६ वाजता हभप गोपाल महाराज उरळकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने या उत्सवाची पूर्णाहुती होणार आहे.

याचा समस्त भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन आशीष पवित्रकार,शिवलाल बोर्डे,हरिश्चंद्र पिसे,डॉ राम पागृत,जीवन देशमुख,हरिदास मिसुरकर, तुळशीराम तायडे,रामभाऊ पाटील,मधुकरराव देशमुख, पिल्ले,वसंत गणेकर,निलेश पाथार, दिलीप अग्रवाल, महेंद्र राठी,मुकेश गुप्ता, जगदीश झुनझुनवाला, निम कर,सुनील फोकमारे,प्रा विजय कुटे,नंदू ढोकणे,राजेंद्र तरोडे,संदीप राऊत,सुनील वाचनकर,नरेंद्र उबाळे,राम दास वैराळे,ज्ञानदेव झटाले,विश्वास ताले,आशीष झिलपे,कमल जोशी,मनोज कस्तुरकर,राजेंद्र सोनवणे,राम आखतकर,अरविंद ताले,आदित्य शेंगोकार, सोनू दुबे,गजानन अंभोरे,गौरव पांडे,सिद्धांत भांगडीया,वेदांत भांगडीया समवेत भागवत सेवा समिती व आशिष पवित्रकार मित्र मंडळाच्या समस्त पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले.

# धोकादायक व्यक्ती गजानन शेगोकार एका वर्षाकरीता स्थानबद्ध

■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी):
शहरातील भोईपुरा पोळा चौक, जुने शहर, अकोला ता. जि. अकोला येथे राहणारा कुख्यात गुंड माधव उर्फ मडया गजानन शेगोकार वय २४ वर्ष याचे वर यापुर्वी खुनाचा प्रयत्न करणे, घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापुर्वक जबर दुखापत पोहोचवणे, घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापुर्वक दुखापत पोहोचवणे, इतरांचे जिवीत किंवा व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात आणणारी कृती करणे, एखादया व्यक्तीला खोटा पुरावा देण्यासाठी धमकी देणे, अश्लिल कृती करणे, नुकसान करुन आगळीक करणे, शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, फौजदारीपात्र धाकदपटशा करणे असे बरेच गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याचे वर यापुर्वी विवीध कलमान्वये प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली होती, परंतु त्याचे वर त्याचा काहीच परिणाम झालेला नव्हता. तो प्रतिबंधक कार्यवाही करून सुध्दा जुमानत नसल्याने त्याचे विरूध्द गंभीर दखल घेण्यात येवुन कुख्यात गुंड माधव उर्फ मडया गजानन शेगोकार, याचे गुन्हेगारी वृत्तीस आळा बसावा याकरीता मा. पोलीस अधीक्षक, अकोला यांनी त्यास स्थानबध्द करण्याबाबतचा प्रस्ताव मा. प्र. जिल्हादंडाधिकारी, अकोला यांना सादर केला होता.


मा. प्रभारी जिल्हादंडाधिकारी, श्री. राम दास सिध्दभट्टी यांनी सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी करून तसेच स्वतःचे स्त्रोताव्दारे माहीती मिळवुन सदर कुख्यात गुंड हा धोकादायक व्यक्ती असल्याची खात्री झाल्याने त्यास एक वर्षा करीता अकोला जिल्हा कारागृहात स्थानबध्द ठेवण्याबाबतचा आदेश दि. २५/०२/२०२५ रोजी पारीत केला.

मा. जिल्हादंडाधिकारी, सा. अकोला यांचे आदेशावरून माधव उर्फ मडया गजानन शेगोकार याचा तात्काळ शोध घेवुन त्यास सदरचा आदेश तामील करून त्यास दिनांक २५/०२/२०२५ रोजी जिल्हा कारागृहात स्थानबध्द केले.

सदरची कार्यवाही पुर्ण करण्याकरीता मा. पोलीस अधीक्षक, श्री. बच्चन सिंह यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक, अभय डोंगरे, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकणी, स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस निरीक्षक शंकर शेळके, पोउपनि माजीद पठाण, पोहेकॉ. ज्ञानेश्वर सैरिसे, पोकॉ. उदय ईश्वरीप्रसाद शुक्ला, तसेच पोलीस स्टेशन जुने शहर येथील पोनि. नितीन लेव्हरकर, पोकॉ. पवन डब्लकर, सागर सिरसाट यांनी परिश्रम घेतले.' अकोला जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहुन शांतता राहावी याकरीता अशा प्रकारचे गुन्हे करणारे व कारवाईस न जुमानणा-या सराईत गुन्हेगारांवर येणा-या जि. प. व मनपा निवडणुका, आगामी सण उत्सव काळात एम पीडीए व इतर प्रचलित कायद्यान्वये कारवाई करण्यात येणार आहे. ' असा इशारा जिल्हा पोलीस अधिक्षक बच्चन सिंह यांनी दिला आहे.

# जगतगुरु संत तुकाराम महाराज मंदीराचा जिर्णोद्धार शिवरात्री पर्वावर संत मुर्त्यांची पुनर्प्रतिष्ठापना





■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी):
विदर्भाचे देहू म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र बालवाडी येथील जगद्गुरु संत शिरोमणी तुकाराम महाराज मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला असून शिव रात्री पर्वावर मंदिरातील संतांच्या संगम वरी मुर्त्यांचा पुनर्प्रतिष्ठापना तथा शिवलिंग व नंदीकेश्वराची प्राणप्रतिष्ठा विधीवत संपन्न होत आहे.या निमि त्ताने विविध धार्मिक कार्यक्रम होम हवन व शिवलिला अमृत ग्रंथाचे पारायण.नामसंकिर्तनादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेदेहू संस्थानचे अध्यक्ष तथा संत तुकाराम महाराजांचे वंशज हभप पुरुषोत्तम महाराज मोरे यांचे हस्ते संतांच्या मुर्त्याची प्राणप्रतिष्ठा होत असून श्रीसंत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचे अध्यक्ष हभप वासुदेवराव महल्ले महाराज प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.संत मुर्त्याची व शिवलिंगांची नगर प्रदक्षिणा शिवरात्रीच्या पूर्वसंधेला संत मुर्त्याची व शिवलिंगांची नगर प्रदक्षिणा व शोभायात्रा हर हर महादेव व ज्ञानोबा तुकारामाचे गजरात पार पडली जळगान नहाटे येथील भजनी दिंडी सहभागी झाली होती.या सोहळ्याची सांगता गुरुवार दि.२७ला महापरसादाने होत आहे भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा.

# शिक्षक भरती घोटाळ्याची चौकशी करण्याची आम आदमी पक्षाची मागणी



■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी):
शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या अनियमितता आणि बेकायदेशीर शिक्षक भरतीवर आम आदमी पक्षाने कडक भूमिका घेतली आहे. या शिक्षक भरती घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी आम आदमी पक्षाच्या अकोला युनिटने केली आहे.स्थानिक सर्किट हाऊस येथे आयोजित पत्रकार परिषदेत सरकारी निर्णय आणि उच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या सर्व शिक्षण अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे नोंदवण्याची मागणी करण्यात आली. राज्यातील शिक्षक भरती प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी सरकारने २३ जून २०१७ रोजी 'पवित्र पोर्टल' प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला होता. याशिवाय, ३ ऑगस्ट २०२१ रोजी उच्च न्यायालयानेही स्पष्ट आदेश दिले होते की या प्रणालीशिवाय कोणतीही नियुक्ती वैध मानली जाणार नाही. परंतु अमरावतीच्या तत्कालीन विभागीय शिक्षण उपसंचालकांनी या आदेशाकडे आणि सरकारी निर्णयाकडे दुर्लक्ष करून १६२ शिक्षक सेवक, ४६ प्रयोगशाळा सहाय्यक, ३ कनिष्ठ लिपिक, २ शिपाई आणि १ अर्धवेळ ग्रंथपाल यांना वैयक्तिक मान्यता दिली. ही प्रक्रिया पूर्णपणे बेकायदेशीर आहे आणि त्यातून शिक्षण विभागातील भ्रष्टाचार दिसून येत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

# ग्रामपंचायतीचे साहित्य चोरी, टिन शेडची तोडफोड; तक्रार दाखल

**वाडेगांव :** पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीवरील साहित्य चोरी गेल्याची तसेच स्मशानभूमीतील टिन शेडची तोडफ्फोड केल्याची घटना उघडकीस आली असल्याने या संदर्भात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

सरपंच राजेश्वर पळसकार तसेच सचिव रवींद्र इंगळे बाळापूर पोलीस स्टेशन मध्ये दिनांक २२ फेब्रुवारी रोजी तक्रार दाखल केली असल्याची माहिती प्राप्त झाली असून ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या हिंदू स्मशानभूमी मध्ये नवीनच बांधलेले अंदाजे किंमत पन्नास हजार रुपये पर्यंत असलेल्या टिन शेडची अज्ञात इसमाने तोडफ्फोड केली तसेच पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या खैवाली विहीरी वरील साहित्य पॅनल बोर्ड दोन अंदाजे किंमत तिस हजार रुपये लोखंडी सी. आय. डी. जॉनइड अंदाजे किंमत आठ हजार रुपये तसेच पीव्हीसी पाईप अंदाजे किंमत सहा ते सात हजार रुपये असे साहित्य अज्ञात इसम ाने चोरून नेले असल्याचे दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. तर उघडकीस आलेल्या घटनेबाबत नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात चर्चा केली जात असुन संमधीत अज्ञात इसमाचा शोध घेवून कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करण्यात येवून सुध्दा व चोवीस तास उलटूनही पोलिस प्रशासना कडून पंचनामा तसेच कुठल्याही प्रकारची तक्रारीनुसार कारवाई केली नसल्याची माहिती समोर आली आहे

त्यामुळे नागरिकांमध्ये संमधीत पोलिस प्रशासना बाबतीत रोष व्यक्त करण्यात येवून उलट सुलट चर्चा केली जात आहे. तसेच स्थानिक पोलीस चौकीचे प्रभारी अधिकारी यांच्या कडून माहिती घेतली असता सरपंच सचिव यांच्या कडून दाखल करण्यात आलेल्या तक्रारी संदर्भात माहितीच नसल्याचे समोर करण्यात आले.

# इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**मूर्तिजापूर :** ५८ वर्षीय इसमाने आपल्या राहत्या घरात सोमवारी दुपारी १.३० वाजेदरम्यान गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. प्राप्त माहितीनुसार, श्रीकृष्ण रमेश धारपवार (३८) याने दिलेल्या फिर्यादीनुसार, त्याचा घरच्या बाजूला आपल्या कुटुंबासह राहत असलेले त्यांचे काका लक्ष्मणपुंजाजी धारपावर (५८) यांनी घरात लाकडी नाटीला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा फिर्यादीवरुन ग्रामीण पोलिस ठाण्यात सदर प्रकरणी १९४ बीएनएस नुसार अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्रीधर गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय संजय खंडारे करीत आहेत. वृत्त लिहिपर्यत आत्महत्येचे कारण कळू शकले नाही.

# जगद्गुरुंची गाथा ही अनुभूती : श्री ज्ञानेश्वर महाराज वाघ



■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी):
समृद्ध असणाऱ्या भारतीय अध्यात्मिक सारस्वतात संस्कृता पासून तर प्राकृता पर्यत अमाप ग्रंथसंपदा असून , त्यातील वेद व श्रीम द्भगवद्गीता ही भगवदोक्ती , ग्रंथराज ज्ञानेश्वरी ही कृती तर जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराजांची अभंग गाथा ही अनुभूती असल्याचे निष्ठापूर्वक मत भागवताचार्य श्री ज्ञानेश्वर महाराज वाघ यांनी मांडले.ते आज श्री संत वासुदेव जी महाराज स्मृती मंदिर श्री ज्ञानेश आश्रम श्रीक्षेत्र वारी भैरवगढ येथे आयोजित गाथा पारायण तथा प्रवचन सप्ताहातील तृतीय पुष्प गुंफित असतांना बोलत होते. ते पुढे म्हणाले की, वारकरी संतांनी निर्माण केलेले वाङ्मय हे केवळ शब्दाच्या पंखावर बसून कल्पनेच्या आकाशात गेलेले स्वैर उड्डाण नसुन शब्दाच्या माध्यमातून भगवान पंढरीशांच्या हृदयापर्यंत पोहोचण्याचे सुलभ व निश्चित फलदायिनी साधन होय. मानवी जीवन जगत असताना प्रत्येकच क्षेत्रातील लोकांना अनुभव हे येतच असतात पैकी प्रापंचिक क्षेत्रातील अनुभव थोड्याबहूत फरकाने सर्वांचे सारखेच असतात व त्यातील बहुतांश अनुभव इतरांना सांगणे हे दूषणावह असून फक्त परमार्थिक क्षेत्रातील अनुभवच इतरांना सांगणे ही भूषणा व बाब आहे. म्हणूनच संतांचे अभंग हे यमक जोडून निर्माण केलेले नुसते काव्य नसून ते अनुभव रत्नांची खान आहेत. परंतु भगवान श्रीकृष्ण व तुकाराम महाराज या जगद्गुरुद्वयांच्या सत्य चरित्राबाबतीत असलेली अनभिज्ञता तथा थोड्याफार प्रमाणात ऐकिव माहितीच्या आधारे पसरविल्या जाणाऱ्या विपरीत माहितीबद्दल महाराजांनी यावेळी खंत व्यक्त केली. त्याकरिता संत श्री वासुदेव जी महाराजांनी वेद, शास्त्र, पुराण तसेच संत साहित्य व राज्यपत्रादि पुराव्यांच्या आधारे सखोल अभ्यासांती सिद्धस्थ लेखणी द्वारा लिहिलेल्या उभय जगद्गुरुंचे चरित्रे वाचण्याचा सल्लाही महाराजांनी यावेळी दिला. तसेच संतश्री वासुदेवजी महाराज यांच्या परंपरा आहेत तशा स्विकारुन जोपासण्याच्या व संवर्धनाचे कार्य श्रीयुत ज्ञानेश्वरजी महाराज वाघ हे संघर्षपूर्वक समर्थपणे पंचम वेद असणाऱ्या जगद्गुरु श्रीसंत तुकाराम महाराजांच्या गाथेचे पारायण व निरुपणाच्या माध्यमातून करीत असल्याचे गौरवोद्गार श्रीचे कुलोत्पन्न श्रीगुरु अशोकजी महाराज जायले यांनी किर्तन प्रसंगी काढले असे ज्ञानेश्वर महाराज भालतिलक कळवितात.

## अकोला-काचीगुडा एक्स्प्रेसच्या घोषणेला १५ वर्षे

# अकोला येथून सुटणारी एकमेव लांब पल्ल्याची रेल्वे

■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी):
अकोला येथून सुटणारी एकमेव लांब पल्ल्याची रेल्वे असलेल्या अकोला-काचीगुडा एक्स्प्रेसच्या घोषणेला आज १५ वर्षे पूर्ण होत आहेत. रेल्वे अर्थसंकल्प २०१०-११ मध्ये २४ फ्रेब्रुवारी २०१० रोजी तत्कालीन रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांनी या गाडीची घोषणा केली होती. अकोला हे विभागातील सर्वाधिक महसूल देणाऱ्या स्थानकांपैकी एक असतानाही, येथे नवीन लांब पल्ल्याच्या गाड्या सुरू झालेल्या नाहीत. यामुळे लोकप्रतिनिधी आणि रेल्वे प्रशासनाच्या उदासीनतेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.अकोला-पूर्णा सेक्शनचे ब्रॉडगेज रूपांतर

२००८ मध्ये अकोला-पूर्णा सेक्शनचे ब्रॉडगेज रूपांतर पूर्ण झाल्यानंतर १७६३९/१७६४० काचीगुडा-नांदेड एक्स्प्रेस ही दैनिक गाडी म्हणून अकोला पर्यत वाढविण्यात आली. या मार्गावर अकोल्याहून सुटणारी ही पहिली व शेवटची नियमित धावणारी लांब पल्ल्याची गाडी ठरली.

गाडीच्या वेळापत्रकात बदल: नरखेड पर्यत विस्तार सुरुवातीला ही गाडी दररोज अकोल्यापर्यत धावत असे. २०१५ मध्ये या गाडीचे वेळापत्रक बदलण्यात आले आणि



ती आठवड्यातून सहा दिवस नागपूर-इटारसी लाइनवरील नरखेड स्टेशनपर्यत धावू लागली, तर आठवड्यातून फक्त एक दिवस अकोल्यापर्यत धावते. सध्या अकोला-वाशीम-हिंगोली मार्गावर केवळ एकच दैनिक एक्स्प्रेस गाडी, दोन पॅसेंजर आणि एक डेमू सेवा उपलब्ध आहे. २०२४ ला प्रवासी संघटनेच्या मागणीला यश येऊन मुंबई छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस - जालना जन शताब्दी एक्सप्रेस हिंगोली (डेक्कन) पर्यत वाढवण्यात आली. अकोला रेल्वे स्टेशन: सर्वाधिक उत्पन्न देणारे स्टेशन अकोला हे मुंबई-हावडा आणि हैदराबाद-जयपुर क्रॉसिंगवर असलेले एक प्रमुख स्टेशन असून विभागातील सर्वाधिक उत्पन्न मिळवणाऱ्या स्टेशनपैकी एक असूनही, गेल्या पंधरा वर्षांत येथून एकही नियमित नवीन लांब पल्ल्याची गाडी सुरू करण्यात आलेली नाही. यामुळे अकोल्याच्या रेल्वे विकासाची वाटचाल ठप्प झाली आहे. स्थानिक नागरिक आणि प्रवाशांनी निवडून आलेल्या प्रतिनिधी आणि रेल्वे अधिकाऱ्यांवर प्रदेशाच्या वाढत्या वाहतूक गरजांकडे दुर्लक्ष केल्याबद्दल टीका केली आहे.

**प्रवासी आणि संघटनांची मागणी**

प्रवासी, व्यापारी व प्रवासी संघटनांना आशा आहे की रेल्वे त्यांच्या दीर्घकाळापासूनच्या म ागण्यांकडे लक्ष देईल आणि शहराच्या वाढत्या लोकसंख्येला आणि आर्थिक महत्त्वाला अनुसरून नवीन लांब पल्ल्याच्या गाड्या सुरू करेल, तसेच सुरू असलेल्या साप्ताहिक गाड्या दैनिक कराव्यात.

**अकोला-काचीगुडा एक्स्प्रेस: जीवनरेषा**

अकोला-काचीगुडा एक्स्प्रेस महाराष्ट्र आणि तेलंगणातील महत्त्वाच्या ठिकाणांशी अकोल्याचा संपर्क साधणारी ही गाडी प्रवाशांसाठी जीवनरेषा ठरली असून सध्या, प्रगती आणि विकासाच्या मागण्यांमध्ये, अकोला-काचीगुडा एक्स्प्रेस ही अकोल्याची एकमेव लांब पल्ल्याची गाडी म्हणून टिकून आहे.

# श्री शंकर सस्थांन देवळीवेस महाशिवरात्री यात्री निमीत्त संत तुकाराम गाथा पारायण

■हिवरखेड,दि.२५ (प्रतिनिधी):
हिवरखेड येथील जागरुक शंकर सस्थांन देवळीवेसच्या भोलेनाथ भक्ताना पावनारा असून येथे महाशिवरात्रीला दरवर्षी भागवत अंखड हरीनाम सप्ताह आयोजीत करत असतात तर यावर्षी सूद्दा २१/२/२५/ते २८/२/२५ पर्यत पांडूरग परमात्मा रुखमाई माता ज्ञानोबाराय तुकोबाराय या संताच्या आर्शीवादाने जगतगूरु तुकारामाची गाथा व पारायण सोहळा श्रिमती ह भ प हर्षाताई अनंतराव गेबड यांचे व्यासपीठ नेतृत्वात आयोजीत केले असून सकाळी काकडा दूपारी गाथा पारायन तर सध्यांकाळी हभप शंकरराव देशमूख नागापुरे गूरजी नाठे महाराज ईत्यादी विठ्ठल मंदीर वारर्कयाचे नेतृत्वात हरीपाठ २७/२/२५ ला ग्रंथ दिडीं व शंकराची पालखीची मिरवनूक विठ्ठल मंदीर,भवानीम ाता मंदीर महीला भजनी मडळ गायत्री महीला भजनी मंडळाच्या वारकरी टाळकरी माळकरी यांचे दिंडी पताका सह निघनार असून २८/२/२५ ला हभप काळमेघ महाराज आळंदीकर यांचे काल्याचे कीर्तन सकाळी ११ वाजता होइल कीर्तनानतंर दहीहांडी फोडन्यात येईल त्यानंतर सालाबादप्रमाने महाप्रसाद होईल तरी पंचक्रोशीतील भक्त गण यात्रेतील सामील सर्वानी लाभ घ्यावा असे शंकर सस्थांन देवळीवेस कडून प्रसीद्दी करण्यात आले.

# राष्ट्रसंत सेवाश्रमाचे अध्यक्ष संस्थापक गुरुवर्य तीमांडे महाराज यांचे निधन

■पातुर,,दि.२५ (प्रतिनिधी)
:तालुका प्रतिनिधी येथील पातुर बाळापुर रोड लगत असलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज श्री गुरुदेव सेवाश्रमाचे संस्थापक अध्यक्ष संत गुरुवर्य रामराव तीमांडे महाराज यांचे दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ ला सकाळी आठ वाजता चे दरम्यान अकोला येथे उपचार घेत असताना निधन झाले त्यांच्या निधनामुळे समस्त गुरुदेव प्रेमी मध्ये शोक व्यक्त होत आहे त्यांनी पातुर शहरांम ध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्याचा वाययाचा प्रचार करण्यासाठी आपले सर्वस्व आयुष्य खर्ची घातले त्यांच्या त्यागा मुळे गुरुदेव प्रेमी आणि गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे त्यांनी पातुर शहरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सेवा आश्रमाची स्थापना केली भव्य आश्रम ची निर्मिती केली सदर ठिकाणी प्रातःकाळी सामुदायिक ध्यान,संध्याकाळी सामुदायिक प्रार्थना आणि वर्षभर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ठरवून दिल्याप्रमाणे सर्व कार्यक्रम राबवून जनतेमध्ये जनजागृती केली पुढील कार्यासाठी राष्ट्रसंत सेवा आश्रम मध्ये कार्यरत गुरुदेव प्रेमी मधून १६ महिला पुरुषांची आणि बाल कीर्तनकाराची मांदियाळी उभी केली.



येथील रेणुका माता टेकडीला लागूनच राष्ट्रसंत विश्वधाम टेकडी येथे भव्य रामकृष्ण हरी मंदिर प्रार्थना मंदिर संत लिलामाता यांची समाधी राष्ट्रसंतांच्या पुतळ्याची निर्मिती तथा वृक्ष लागवड तलाव आदींची निर्मिती केली त्यांची अंत्यविधीची मिरवणूक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सेवा आश्रम पासून बाळापुर पातुर महामार्गाने मिलिंद चौक, चिरा चौक,तेलीपुरा, गुजरे लाईन, पाटील मंडळी ते राष्ट्रसंत विश्वधाम टेकडी येथे लिला माता समाधी परिसरात अत्यंत दुखद अंतकरणाने अंत्यसंस्कार करण्यात आला यावेळी शहरातील नागरिक पंचक्रोशीतील भाविक तथा विदर्भातून मोठ्या प्रमाणात गुरुदेव प्रेमी आणि गुरुदेव सेवा मंडळाचे पदाधिकारीयांची उपस्थिती होती.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८९४७१+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# निरामय

## कोणतं ऑलिव्ह ऑईल घ्यावं?

ऑलिव्ह ऑईलच्या गुणधर्माबाबत आपण बरंच काही ऐकतो. या तेलात फॅट्सचं प्रमाण तुलनेने बरंच कमी असतं. त्यामुळे मधुमेही, हृदयासंबंधी तक्रारी असणाऱ्यांना ऑलिव्ह ऑईल वापरण्याचा सल्ला दिला जातो. बाजारात ऑलिव्ह ऑईलचे विविध



प्रकार पहायला मिळतात. त्यापैकी एक्स्ट्रा व्हर्जिन ऑलिव्ह ऑईल अधिक आरोग्यदायी असतं. या तेलावर कमीत कमी प्रक्रिया केलेली असते. त्यामुळे या ऑलिव्ह ऑईलमधले पोषक घटक टिकून रहातात.

साध्या ऑलिव्ह ऑईलवर बरीच प्रक्रिया झालेली असते. या दरम्यान तेलातले पोषक घटक निघून जातात आणि

आहारतंत्र

त्याचा शरीराला काहीच लाभ होत नाही. एक्स्ट्रा व्हर्जिन ऑलिव्ह आईलमध्ये अँटी ऑक्सिडंट्सचं प्रमाण बरंच जास्त असतं. तसंच यात लाभदायी फॅट्सही असतात.

यातल्या फेनॉलिक नामक घटकामुळे मधुमेहाला प्रतिबंध करणं शक्य होतं. तसंच मेंदूचं आरोग्यही सुधारतं.

## रडणे ही फायद्याचे!

रडणे ही एक सामान्य बाब आहे. अनेकदा छोट्या छोट्या गोष्टींवरुन ट्रिगर होऊन लोकांना रडू येते. सामान्यपणे असे म्हणतात की, रडणे ही अतिशय भावुक बाब आहे; पण संशोधनात असे दिसून आले आहे, रडल्याने शरीर आणि मेंदू दोन्ही अतिशय हलके होतात. अगदी बाळाचा जन्म झाल्यावरही तो पहिला रडतो. बाळ रडल्याने त्याचे आरोग्य उत्तम राहिते.

रिफ्लेक्स अश्रू म्हणजे डोळ्यांमध्ये साचलेली धूळ, घाण आणि धूर स्वच्छ करणारे अश्रू. सतत वाहणारे अश्रू तुमचे डोळे ओले ठेवतात आणि त्यांना संसर्गापासून वाचवतात. भावनिक अश्रूंचेही अनेक फायदे आहेत.

सततच्या अश्रूंमध्ये ९८ टक्के पाणी असते, तर भावनिक अश्रूंमध्ये ताण संप्रेरके आणि इतर विषारी पदार्थ असतात. संशोधकांना असे आढळून आले आहे, की अश्रू शरीरातून विषारी पदार्थ बाहेर काढतात.

अश्रूचे प्रकार

* रिफ्लेक्स अश्रू
* सतत अश्रू
* भावनिक अश्रू



रडल्याने स्वतःला शांत करण्यास मिळते मदत होते. रडणे हा कदाचित स्वतःला शांत करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. संशोधनात आढळून आले, की रडण्यामुळे पॅरा-सिम्पेथेटिक नर्व्हस सिस्टम (पीएनएस) सक्रिय होते. पीएनएस तुमच्या शरीराला आराम करण्यास आणि पचन करण्यास मदत करते. काही वेळ रडल्यानंतर शांत वाटू लागते.

आधार मिळतो

नैराश्य येत असेल, तर रडल्याने तुमच्या आजूबाजूच्या लोकांना कळते, की तुम्हाला आधाराची गरज आहे. लहान मूलही लक्ष वेधण्यासाठी रडते. असे केल्याने अनेकांना बरे वाटते. दुःखाचा सामना करण्यास मदत मिळते. दुःख करणे ही एक प्रक्रिया आहे. त्यात दुःख, सुन्नता आणि रागदेखील समाविष्ट आहे. शोक करताना रडणे महत्त्वाचे आहे. हे तुम्हाला या दुःखावर मात करण्यास मदत करते.

जाणून घ्या

त्रास कमी होतो

भावनिक वेदना कमी

दीर्घकाळ रडल्याने ऑक्सिटोसिन आणि एंडोर्फिन बाहेर पडतात. हे चांगले वाटणारे रसायने शारीरिक आणि भावनिक वेदना कमी करण्यास मदत करू शकतात. एकदा एंडोर्फिन बाहेर पडले, की शरीर थोडे सुन्न वाटू शकते. त्याच वेळी, ऑक्सिटोसिन तुम्हाला शांत वाटण्यास मदत करते.

मूड सुधारतो

रडण्यामुळे वेदना कमी होण्यास मदत होतेच; शिवाय मूडही सुधारतो. जेव्हा रडण्याच्या वेळी तुमच्या तोंडातून खूप हवा पटकन आत घेतो, त्यामुळे मेंदूचे तापमान कमी होते. जेव्हा तुमच्या मनाचे तापमान थंड असते, तेव्हा तुमच्या शरीरालाही बरे वाटते. यामुळे मूड सुधारतो.

भावना संतुलित

रडणे म्हणजे फक्त दुःखाला दिलेला प्रतिसाद नाही. कधीकधी तुम्ही खूप आनंदी, घाबरलेले किंवा तणावग्रस्त असतानाही रडता. येल विद्यापीठातील संशोधकांचा असा विश्वास आहे, की अशा प्रकारे रडल्याने भावनिक संतुलन पुनर्संचयित होण्यास मदत होते.

## स्लीप ॲप्नियामुळे...

नवसंशोधन

ऑब्स्ट्रक्टिव्ह स्लीप ॲप्निया म्हणजे झोपेत अडथळे येणाऱ्या महिलांना कर्करोग होण्याची शक्यता पुरुषांच्या तुलनेत अधिक असल्याचं एका संशोधनातून समोर आलं आहे. युरोपियन रॅस्पिरॅटरी जर्नलमध्ये हे संशोधन प्रकाशित करण्यात




आलं आहे. हा विकार असणाऱ्या जवळपास २० हजार प्रौढ रुग्णांच्या आरोग्याची माहिती यासाठी तपासण्यात आली. या तपासणीतून शास्त्रज्ञांनी काही निष्कर्ष काढले आहेत. या पैकी दोन टक्के लोकांना कर्करोगाचं निदान झालं होतं. म्हणजेच स्लीप ॲप्नियामुळे कर्करोगाचा धोका वाढू शकतो. तसंच स्थूलपणा हा स्लीप ॲप्निया आणि कर्करोग अशा दोन्ही विकारांना कारणीभूत ठरू शकतो, असा निष्कर्ष यातून निघत असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. तसंच कर्करोगामुळे स्लीम ॲप्नियाचा धोका नसतो हेही समोर आल्याचं शास्त्रज्ञ सांगतात.

## कठीण कवचाची फळं खा

दंतारोग्य

तोंडाचं आरोग्य जपण्यासाठी फक्त दोन वेळा दात घासण्यावर भर दिला जातो. मात्र एवढ्यावरच थांबून चालण्यासारखं नाही. दातांना अधिक सक्षम आणि बळकट करण्यासाठी बरंच काही करावं लागतं. जबड्यांना व्यायाम मिळण्यासाठी कठीण कवचाची फळं खाण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात.



तसंच गाजर, काकडी तुकडे करून खाणं टाळावं. प्रक्रिया केलेले, मऊ पदार्थ कितीही चांगले वाटत असले तरी त्यांचा दातांना काहीच उपयोग होत नाही. पेरू, सफरचंद, पिअर अशी टणक फळं खायला हवीत. मुलांनाही अशी फळं खायला द्यावीत, असंही तज्ज्ञ सांगतात. आपल्या खाण्यापिण्याच्या सवयींवर दातांचं आरोग्य अवलंबून असतं. यामुळे गोड आणि आंबट पदार्थांचं सेवन मर्यादित प्रमाणातच करायला हवं.

## का वाढते काळजी?

आपल्यापैकी अनेकांना विविध चिंता, काळज्यांनी ग्रासलेलं असतं. सतत अस्वस्थता वाटत रहाते. सारखी काळजी करत रहाणं हा एक मनोविकार आहे. ही समस्या वाढायला अनेक बाबी कारणीभूत ठरतात. दैनंदिन आयुष्यातल्या सवयींमुळे मनाला शांतता लाभत नाही. चिंतेचं प्रमाण कमी करण्यासाठी या सवयी सोडणं गरजेचं आहे.



कमी रक्तदाबाची समस्या असणाऱ्यांना कॉफीमुळे बरं वाटतं. पण यामुळे चिंता, काळजीचं प्रमाण कमी होत नाही. कॉफीमुळे हृदय गती वाढते. काळजी वाटू लागल्यावर ही धडधड अधिकच तीव्र होते आणि आपल्याला अस्वस्थ तसंच निराश वाटू लागतं. त्यामुळे सतत काळजी करणाऱ्यांनी कॉफीचं सेवन टाळायला हवं.

आपण कुठे चुकतो?

अपुऱ्या झोपेमुळे काळजीत भर पडू शकते. त्यामुळे दररोज पुरेशी झोप घेणं गरजेचं आहे. अपुऱ्या झोपेमुळे हार्मोन्सचं संतुलन बिघडतं आणि त्रास अधिकच वाढतो.

सतत स्मार्टफोन आणि सोशल मीडिया ॲप्स तपासत रहाण्याची सवय मारक ठरू शकते. यामुळे चिंतेत भरच पडते. चिंता, काळजी कमी करण्यासाठी वेळेत जेवणं गरजेचं आहे. कामाच्या नादात किंवा इतर कोणत्याही कारणामुळे जेवण टाळल्यामुळे शरीराचं संतुलन बिघडतं आणि आपल्याला अस्वस्थ वाटू लागतं.

## तुळशीयुक्त दुधाचे लाभ

सध्याच्या धकाधकीच्या आयुष्यात अनेकांवर ताण असतो. धावपळीमुळे थकवा येतो. काहीच करावंसं वाटत नाही. रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्याने सतत आजारपणं येत रहातात. हा त्रास कमी करण्यासाठी डॉक्टरांकडे धाव घेतली जाते. मात्र विविध औषधी घटकांनी समृद्ध तुळस अनेक विकारांवर रामबाण उपाय ठरू शकते. सर्दी-खोकला झाल्यावर आपण हळद



घातलेलं दूध पितो. त्याचप्रमाणे तुळस घातलेलं दूधही गुणकारी असतं. दुधासोबत घेतल्याने तुळशीचा प्रभाव अनेक पटींनी वाढतो. दररोज ग्लासभर तुळस घातलेलं दूध प्यायल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि अनेक विकारांना दूर ठेवता येतं

तुळस घातलेलं दूध अगदी सोप्या पद्धतीने बनवता येतं. यासाठी तुळशीची चार ते पाच पानं घ्या. एका भांड्यात पेलाभर दूध गरम करा. त्यात तुळशीची पानं घालून दोन मिनिटं उकळून घ्या. दूध थोडं थंड झाल्यावर पेल्यात गाळून घ्या. हे दूध रिकाम्या पोटी घेतल्याने अधिक लाभदायी ठरतं.

आयुर्वेद आणि विकार

तुळसयुक्त दुधामुळे हृदयाला बळकटी मिळते. तुळशीतल्या औषधी घटकांमुळे शरीराला ऑक्सिजनचा पुरवठा अधिक चांगल्या प्रकारे होतो तर दुधामुळे अनेक पोषक घटक हृदयापर्यंत पोहाचतात. तुळस आणि दुधामुळे श्वसनसंस्थेचं कार्यही सुरळीत सुरू रहातं. दिवसभराच्या धावपळीनंतर मेंदूला विश्रांतीची गरज असते. गरम तुळसयुक्त दुधामुळे मेंदू ताजतवाना होतो.

## मोतीबिंदू असेल तर...


डोळ्यांचं आरोग्य



मोतीबिंदू हा सर्वसामान्य असा नेत्रविकार आहे. शस्त्रक्रियेद्वारे मोतीबिंदू काढून टाकता येतो. पण अनेक जण थंडीमध्ये मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करायला प्राधान्य देतात. मात्र हा समज पूर्णपणे चुकीचा आहे. त्यातच मोतीबिंदू फक्त शस्त्रक्रियेने बरा होऊ शकतो. हा विकार बरा करण्याचा दावा करणारी औषधं बाजारात मिळतात. पण या औषधांचा कोणताही लाभ होत नाही. दृष्टी वाढवणारी कोणतीही औषधं बाजारात उपलब्ध नसतात. त्यामुळे अशा भूलथापांना बळी पडता कामा नये. तज्ज्ञ डॉक्टरांकडूनच सल्ला घ्यायला हवा. तसंच वय वाढत असताना आपल्या डोळ्यांची तपासणी आपणच करायला हवी. एक डोळा बंद करून दुसऱ्या डोळ्याने दिसतं का, हे तपासून पहायला हवं.

## परिणाम ताणाचे

ताणामुळे तुमचं शारीरिक आणि मानसिक आरोग्य धोक्यात येऊ शकतं. ताण विविध प्रकारांनी आपल्या शरीराचा ताबा घेऊ लागतो. नव्या संशोधनानुसार अतिताणामुळे आपल्या भूकेवरही परिणाम होऊ लागतो. ताण माणसाची खाण्याची इच्छाच मारून टाकतो. त्यामुळे भूक लागत नसेल तर त्यामागे ताण हेही एक कारण असू शकतं.



ॲनॉरेक्सिया नर्व्होसा हा भूकेशी संबंधित विकार आहे. हा विकार जडल्यानंतर माणसाला भूक लागत नाही. खाण्याचं प्रमाण खूप कमी होतं. त्यातच काही ठराविक पदार्थ आणि तेही अगदी कमी प्रमाणात खाल्ले जातात. हा विकार जडलेल्या माणसांच्या मनात आपण स्थूल असल्याची भावना निर्माण होते. प्रत्यक्षात ही माणसं खूप बारीक असतात. ताण आणि भूक यांचा संबंध जोडण्यासाठी शास्त्रज्ञांनी उंदरांवर प्रयोग करून बघितला. माणूस आणि उंदीर यांच्या मज्जासंस्थेत बरंच साम्य असल्यामुळे यातून माणसांशी संबंधित निष्कर्ष काढायला मदत होणार आहे.

आव्हानात्मक किंवा कठीण प्रसंगाला शरीर ताणाच्या स्वरुपात प्रतिसाद देतं. ही परिस्थिती वास्तवात अस्तित्वात असू शकते किंवा माणसाच्या कल्पनाविलासामुळेही उद्भवलेली असू शकते. ताणामुळे हृदयाची गती वाढते. उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होऊ शकते. ताण आल्यावर श्वासांचा वेग वाढतो, स्नायू ताठर होतात.

मनारोग्य

प्रत्येकाची ताणाची व्याख्या वेगवेगळी असू शकते. एखाद्या परिस्थितीचा कोणाला खूप ताण येतो तर कोणासाठी ती सर्वसामान्य बाब असते. त्यामुळे ताणाचे परिणामही व्यक्तिनुसार बदलत जातात. ताणामुळे नैराश्य येऊ शकतं. वर्तणुकीत बदल होतो. शिवाय आपल्याला खूप अस्वस्थही वाटतं. ताणामुळे आपला मनावर ताबा रहात नाही. मन:शांती मिळत नाही. परिणामी आपला आत्मविश्वास कमी होऊ शकतो. एकटेपणा आणि नैराश्याची भावना वाढीस लागू शकते.

प्रचंड तणावग्रस्त असणारी व्यक्ती इतरांना टाळण्याचा प्रयत्न करते. ताणामुळे शरीरातलं बळ नष्ट झाल्यासारखं वाटतं. डोकेदुखीची समस्या निर्माण होते. खूप ताण आल्यावर पोटाच्या तक्रारी निर्माण होतात. जुलाब, उलटी, मळमळ, बद्धकोष्ठता अशा समस्या वाढीस लागतात. काही वेळा ताणामुळे छातीत दुखू शकतं. कान वाजणं, हातापायांना घाम येणं ही सुद्धा ताणाची लक्षणं मानली जातात.

## गुणकारी सातूचं पीठ

आजीबाईचा बटवा

सातूचं पीठ खूप गुणकारी असतं. ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्यामुळे मधुमेही सातूचं पीठ खाऊ शकतात. यात लोह, मॅग्नेशियम आणि मँगनीजसारखे घटक असतात. यात सोडियमचं प्रमाणही बरंच



कमी असल्यामुळे उच्च रक्तदाबाचे रुग्णही याचं सेवन करू शकतात. सातूच्या पिठामुळे पचनशक्ती सुधारते. यात विरघळणारे तंतूमय पदार्थ असतात. मसालेदार, तळकट पदार्थ खाल्ल्यानंतर शरीराच्या शुद्धिकरणासाठी सातूचं पीठ पाण्यात मिसळून ते पाणी पिता येईल. वजन कमी करायचं असेल तर सातूच्या पिठाचा आहारात समावेश करता येईल. यातल्या तंतूमय पदार्थांमुळे पोट बराच काळपर्यंत भरलेलं रहातं. सातूच्या पिठात फॉलिक ॲसिड हा घटक असतो. महिलांना फॉलिक ॲसिडची खूप गरज असते. त्यातच लाल रक्तपेशींच्या निर्मितीतही फॉलिक ॲसिड महत्त्वाची भूमिका बजावतं.

## ई-जीवनसत्त्वाअभावी हात, पाय बधिर

शरीराला योग्यरित्या कार्य करण्यासाठी सर्व जीवनसत्त्वे आणि खनिजे आवश्यक असतात. कोणत्याही जीवनसत्त्वाची कमतरता असल्यास त्याचा आरोग्यावर वाईट परिणाम होतो. असे एक महत्त्वाचे जीवनसत्व म्हणजे 'व्हिटॅमिन ई'. 'व्हिटॅमिन ई' आरोग्यासाठी एक आवश्यक अँटिऑक्सिडेंट आहे. ते मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानीपासून पेशींचे संरक्षण करण्यासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी आवश्यक आहे.



हृदयामध्ये गुठळ्या तयार होण्यापासून रोखण्यासाठी 'व्हीटॅमिन ई' आवश्यक आहे.

* शरीरात 'व्हीटॅमिन ई'ची कमतरता असल्यास हात आणि पाय सुन्न होऊ शकतात. त्याची लक्षणे स्नायूंमध्ये कमजोरी, चालण्यात अडचण, डोळ्यांची समस्या, कमकुवत प्रतिकारशक्ती, वारंवार आजारी पडणे, आळस आणि थकवा येणे ही आहेत. १४ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या पुरुष आणि महिलांनी दररोज १५ मिलीग्राम 'व्हिटॅमिन ई' घेणे आवश्यक आहे. स्तनपान करणाऱ्या महिलांना दररोज १९ मिलीग्राम 'व्हिटॅमिन ई' आवश्यक असते. 'व्हिटॅमिन ई'च्या कमतरतेवर मात करण्यासाठी दररोज बदाम खा. आपल्या आहारात मोहरीचा समावेश करा. गहू, सूर्यफूल, करडई आणि सोयाबीन तेल वापरा. पीनट बटर आणि शेंगदाणे खा. भाज्यांमध्ये बीट, कोलार्ड, हिरव्या भाज्या, पालक, भोपळा, लाल भोपळा, मिरची, शतावरी आणि फळांमध्ये आंबा आणि एवोकॅडो यांचा समावेश करा. यामुळे शरीरातील' व्हिटॅमिन ई'ची कमतरता पूर्ण होण्यास मदत होते. कुटुंबातील कोणाला 'व्हिटॅमिन ई'ची कमतरता असल्यास त्याचा धोका असू शकतो. त्यामुळे तीव्र स्वादुपिंडाचा दाह, सेलिआक रोग, कोलेस्टॅटिक यकृत रोग आणि सिस्टिक फायब्रोसिसदेखील हे होऊ शकते.

## स्त्री-पुरुषाशिवायही जन्माला येऊ शकते मूल

निसर्गाचा नियमच आहे, की कोणत्याही पुरूष किंवा स्त्रीशिवाय मूल जन्माला येऊ शकतच नाही; मात्र तुम्हाला असे सांगण्यात आले, की या दोघांशिवाय मुल जन्माला येऊ शकते तर कदाचित तुमचा विश्वास बसणार नाही. परंतु आता ते शक्य आहे. कारण शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे, की पुढील दहा वर्षांमध्ये स्त्री आणि पुरुषांशिवाय मुल जन्माला येऊ शकते; मात्र ते पूर्णपणे सुरक्षित आणि प्रभावी सिद्ध करण्यासाठी अजून संशोधन आणि चाचणी आवश्यक आहे.

आरोग्य वेध

ब्रिटनच्या 'ह्युमन फर्टिलायझेशन अँड एम्ब्रियोलॉजी अथॉरिटी'ने (एचएफईए) एक अभूतपूर्व खुलासा केला. त्यामुळे जगाला धक्का बसला आहे. हे एखाद्या सायन्स फिक्शन चित्रपटातील कथेसारखे वाटत असले, तरी विज्ञान ते प्रत्यक्षात आणण्याच्या मार्गावर आहे.

**अंडी व शुक्राणूचे तंत्रज्ञान**

ब्रिटनच्या 'ह्युमन फर्टिलायझेशन अँड एम्ब्रियोलॉजी अथॉरिटी'ने (एचएफईए) च्या म्हणण्यानुसार, शास्त्रज्ञ प्रयोगशाळेत अंडी आणि शुक्राणू वाढवण्याचे तंत्रज्ञान प्रत्यक्षात आणण्याच्या अगदी जवळ आले आहेत. 'इन विट्रो गेमेटस्' (आयव्हीजी) म्हणून ओळखले जाणारे हे तंत्रज्ञान भविष्यात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणू शकते.

**काय आहे हे 'आयव्हीजी' तंत्रज्ञान?**



'आयव्हीजी' तंत्रज्ञानामध्ये प्रयोगशाळेत मानवी अंडी आणि शुक्राणू तयार करण्यासाठी अनुवांशिकरित्या त्वचा किंवा स्टेम पेशींचे पुनर्प्रोग्रामिंग केले जा. 'एचएफईए'चे 'सीईओ' पीटर थॉम्पसन यांनी एका मीडिया स्टेटमेंटमध्ये या तंत्रज्ञानाच्या मदतीने मानवी मूल निर्माण करण्यासाठी एक क्रांतिकारी पाऊल असल्याचे सांगितले आहे. ते म्हणाले, की या तंत्रज्ञानामुळे मानवी अंडी आणि शुक्राणूंची उपलब्धता लक्षणीयरीत्या वाढू शकते.

**अनेक लोकांसाठी वरदान ठरणार?**

शास्त्रज्ञांच्या मते, हे तंत्रज्ञान यशस्वी झाले, यासोबतच ते सुरक्षित, प्रभावी आणि सामाजिकदृष्ट्या स्वीकारार्ह झाले, तर ते अनेक लोकांसाठी वरदान ठरू शकते. विविध कारणांमुळे मूल होऊ शकत नाही, अशा जोडप्यांना हे मदत करू शकते. शिवाय, समलिंगी जोडप्यांचे जैविक मूल जन्माला घालण्याचे स्वप्न पूर्ण करू शकते.

**'आयव्हीजी'तंत्रज्ञानाचे तोटे**

शास्त्रज्ञांच्या मते, या अभूतपूर्व वैद्यकीय पद्धतीमुळे अनेक नैतिक जोखमींचा धोकाही निर्माण होऊ शकतो. आत्तापर्यंतच्या संशोधनातून असे समोर आले आहे, की या नवीन तंत्रज्ञानाला बाळंतपणाशी संबंधित कायद्यांमध्ये मान्यता नाही. हे नवीन तंत्रज्ञान आल्यास नियमांमध्ये बदल करण्याची गरज भासणार आहे. याशिवाय या प्रक्रियेमुळे समाजातील कुटुंबाची पारंपरिक संकल्पना बदलणार का? असा प्रश्न उपस्थित होतो. यामुळे अनुवांशिक विकारांचा धोकादेखील वाढू शकतो. कारण प्रत्येकामध्ये काही दोषपूर्ण गुणसूत्रे असतात. साधारणपणे, यामुळे समस्या उद्भवत नाहीत, कारण आई आणि वडिलांकडून आपल्याला प्रत्येक गुणसूत्रांच्या दोन प्रती वारशाने मिळतात. 'सोलो पेरेंटिंग'मध्ये, दोन्ही प्रती एकाच व्यक्तीकडून येतात. त्यामुळे अनुवांशिक आजाराच्या समस्या अधिक संभवतात.

# लोककल्याणासाठी पत्रकारितेचा आग्रह धरा : अमृता फडणवीस







■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ :

पत्रकारांनी लोककल्याणासाठी पत्रकारिता करावी, असे मत अमृता फडणवीस यांनी व्यक्त केले. मुंबई येथे महाराष्ट्र भूषण २०२४ व व्हॉईस ऑफ मीडिया पॉझिटिव्ह जर्नालिझम अवॉर्ड २०२४ सोहळा, तसेच नवनिर्वाचित जिल्हाध्यक्षांचा सन्मान व पदग्रहण सोहळा आयोजित केला होता. त्यावेळी त्या बोलत होते.

महाराष्ट्र राज्याला अभिमान वाटावा असे उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पाच जणांना महाराष्ट्र भूषण २०२४ सन्मान प्रदान करण्यात आला. त्यात, व्यंकटेश जोशी, सीमा सिंग, वैभव वानखडे, डॉ. विजय दहिफळे, शिवाजी बनकर यांचा समावेश होता. तर पॉझिटिव्ह जर्नालिझम अवॉर्ड २०२४ ने दिलीप वैद्य, सुरज कदम, संदीप खडेकर, बाळासो पाटील, वृषाली पाटील यांना सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी कौशल्य रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, विधान परिषद सदस्य व हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील, स्वामी श्रीकंठानंद (जागृत नाशिक जागृत भारत जागृत विश्व), डॉ. शुभ विलास (लाईफस्टाईल कोच, कथाकार आणि लेखक), ब्रिजेश सिंह (महासंचालक व सचिव, माहिती व जनसंपर्क), अशोक काकडे (जिल्हाधिकारी, सांगली), पाशा पटेल, राजश्री पाटील (अध्यक्ष, गोदावरी समूह व पुरस्कार निवड प्रक्रिया प्रमुख), विशाल पाटील (संपादक, लोकशाही), आशितोष पाटील (संपादक, जय महाराष्ट्र), गगन महोत्रा, प्रदेशाध्यक्ष (इंटरनॅशनल चीफ व्हॉईस ऑफ मीडिया), अनिल म्हस्के (प्रदेशाध्यक्ष व्हॉईस ऑफ मीडिया) आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

आपण निसर्गाचे काहीतरी देणे लागतो, तसे काम पुढच्या पिढीसाठी करावे, असे आवाहन प्रसिद्ध सिनेअभिनेते जॅकी श्रॉफ यांनी केले. अशोक काकडे यांनी उपस्थित सर्व पत्रकारांना कर्तव्यपणाची दीक्षा दिली.

'आवाज विश्वातल्या पत्रकारांचा' या पुस्तकाचे प्रकाशन, 'विजयी भव' आणि 'जिंकलेले योद्धे' या पुस्तकांच्या मराठी, हिंदी, इंग्लिश, कव्हरचे प्रकाशन, मासिक 'नयन अक्षर'चे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पत्रकार आणि पत्रकारिता या विषयांवर कार्यक्रमात चिंतन झाले. मुंबई येथे रंगलेल्या या सोहळ्यात अनेक नामवंत मान्यवर तसेच विदर्भातील पत्रकार उपस्थित होते.

# 'हर बोला हर हर महादेव' चा गजर

■ राजू आगलावे, भंडारा, दि. २५ :

महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर भंडारा जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भात हर बोला हर हर महादेव चा गजर सुरू झाला असून, छोटा महादेव म्हणून प्रसिद्ध गायमुख आणि इतर धार्मिक स्थळे भाविकांनी फुलू लागली आहेत.

भंडारा जिल्ह्यात सातपुडा पर्वतरांगेत गायमुख हे प्रसिद्ध देवस्थान छोटा महादेव म्हणून दूरवर ख्यातीप्राप्त आहे. भंडारासह लगतच्या इतर जिल्ह्यातून तसेच मध्य प्रदेश, छत्तीसगड राज्यातूनही भाविक मोठ्या संख्येने येथे येतात.

गायमुख येथे जवळपास आठवडाभर शिवरात्रीनिमित्त यात्रा भरत असून, मंगळवार पासूनच येथे हजारो भाविकांचे आगमन सुरू झाले आहे. यात्रेत विविध वस्तुंच्या विक्रीची दुकाने सजू लागली आहेत. गायमुख येथे पुरातन शिवमंदिर असून, गायीच्या मुखातून बाहेर पडणारे पाणी भाविक तिर्थ म्हणून सोबत नेतात. महाशिवरात्रीच्या दिवशी येथे हजारो भाविकांची सकाळपासून मोठी गर्दी उसळते. या मतदारसंघाचे विद्यमान आमदार राजू कारेमोरे यांच्याव्यतिरिक्त विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून येथे भाविकांसाठी महाप्रसादाचेही आयोजन केले जाते.






भंडारा जिल्ह्यात आयुधनिर्माणी जवाहरनगर लगत झिरी, पालोरा मार्गावरील डोंगर महादेव, कोरंभी, ता. पवनी यासह इतर अनेक ठिकाणी शिवरात्रीनिमित्त भव्य यात्राभरत असून, दिवसभर भाविकांची मोठी गर्दी असते.

लगतच्या गोंदिया जिल्ह्याच्या अर्जूनी मोरगाव तालुक्यातील प्रतापगड हे शिवरात्रीला भरणाऱ्या यात्रेचे आणखी एक मुख्य ठिकाण असून, येथे सलग तीन ते चार दिवस उत्सव साजरा केला जातो. दरम्यान, शिवरात्रीनिमित्त यात्रेकरू आणि भाविकांचे जत्थे या स्थळांकडे जाताना दिसत असून, सोबत त्रिशुल आणि नंदीबैल असल्याचेही दृष्टीस पडत आहे.

पूर्वीच्या काळी प्रवासाची साधने नसल्याने बैलगाड्यांनी भाविक प्रवास करायचे. त्यावेळी बैलांच्या पायातील घुंगराचा आवाज आता नाहीसा झाला आहे. आता वाहनांचा कर्णकर्कश आवाज करीत भाविक गायमुख आणि अन्य यात्रास्थळी पोहचतात. या यात्रास्थळी पोलीस विभागाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकी

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २५ :

छावा चित्रपटाविरोधात भाष्य केल्याप्रकरणी प्रशांत कोरटकर नामक एका व्यक्तीने इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकी दिल्याची गंभीर बाब उजेडात आली आहे. सावंत यांनी स्वतः या प्रकरणी एक ऑडिओ क्लिप सार्वजनिक केली आहे.



मुख्यमंत्र्यांचे नाव घेऊन प्रशांत कोरटकर नावाचा एक परशूरामी ... धमक्या देत आहे. मला अशा धमक्या नवीन नाहीत. पण या लोकांच्या मनात शिवाजी महाराजांविषयी किती विष भरलेले आहे हे झोपलेल्या मराठा बहुजनांना समजावे म्हणून मी ही रेकॉर्डिंग व्हायरल करत आहे, असे सावंत यांनी म्हटले आहे.

इंद्रजीत सावंत यांनी छावा चित्रपटाविषयी माध्यमांशी संवाद साधताना कथितपणे ब्राह्मणद्वेषी विचार मांडल्याचा आरोप आहे. या प्रकरणी प्रशांत कोरटकर नामक नागपूरच्या व्यक्तीने फोन करून त्यांना धमकी दिली आहे. इंद्रजीत सावंत यांनी स्वतः यासंबंधीची ऑडिओ क्लिप जाहीर करत तसा दावा केला आहे.

प्रशांत कोरटकर नामक व्यक्तीने फोनवरून मला घरात घुसून जीवे मारण्याची धमकी दिली. त्याने मला दोनवेळा फोन करून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. दुसऱ्या फोनमध्ये सदर व्यक्तीने आपल्या सर्व मर्यादा ओलांडल्या. जिथे असेल तिथे घरी येऊन बघून घेईन, असे तो म्हणाला. फोनवरील व्यक्ती शिव्या घालून जातीवाचक बोलत होती, असा आरोप सावंत यांनी केला आहे.

**प्रशांत कोरटकरने फेटाळले आरोप**

प्रशांत कोरटकर यांनी इंद्रजीत सावंत यांनी केलेले आरोप फेटाळले आहेत. मी इंद्रजीत सावंत यांना ओळखत नाही. माझ्या नावाने कुणीतरी खोडसाळपणा केला असेल. नवीन तंत्रज्ञानाचा गैरवापर करून कुणीतरी फसवण्याचा प्रयत्न केला आहे. यापूर्वी १५ वेळा माझे फेसबुक हॅक करण्यात आले. माझा नंबरही यापूर्वी हॅक झाला होता. सावंत यांनी आपल्याशी बोलून फेसबुक पोस्ट करण्याची गरज होती, असे ते म्हणालेत.

**संभाजी ब्रिगेडचा इशारा**

आम्ही इंद्रजीत सावंतांच्या पाठीशी आहोतच, परंतु खरा इतिहास समोर आला पाहिजे. सावंत सर महाराष्ट्राची अस्मिता आहे. त्यांना कुणी धमकी देत असेल, तर त्याला अजिबात सोडणार नाही. दादागिरीच करायची असेल, तर संभाजी ब्रिगेड स्टाइलने धडा शिकवला जाईल, असा इशारा संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ता संतोष शिंदे यांनी दिला.

**मुख्यमंत्र्यांनी घेतली दखल**

दरम्यान, इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना धमकी प्रकरणाची राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेतली असून, यासंदर्भात त्यांनी कोल्हापूर एसपींना फोन करून सावंत यांना आलेल्या कॉलची चौकशी करण्याचे निर्देश दिलेत.

: मुलखावेगळी माणस :

## झाड लावणारा माणूस

लोकमानस



वेड्या माणसांनी हे जग घडवलंयङ्खअसं जेव्हा आपण म्हणतो तेव्हा एका लक्ष्याचा पाठलाग करत ते साध्य करणाऱ्या असामान्य माणसांची ती गोष्ट असते. भारताचे वनपुरुष म्हणजेच फॉरेस्ट मॅन ऑफ इंडिया म्हणून लोकप्रिय जादव यांनी एकट्यानं संपूर्ण जंगल उभारलं आणि पायेंग यांच्या या कामाची दखल आता थेट पाश्चिमात्य देशांकडून घेण्यात येत आहे. नुकताच अमेरिकेतील एका अभ्यासक्रमात पायेंग यांच्या कार्याबद्दल एका धड्याचा समावेश करण्यात आला आहे.

एखादा माणूस एखादं झाड लावतो, कुणी बाग लावतो, कुणी आपला परिसर झाडं लावून हिरवीगार करतो, पण कुणी एक एक झाड लावत जंगल वाढवू शकतो? तेही चौदाशे एकर जमिनीवर? कल्पना तरी करू शकाल का? पण ही कल्पना सत्यात आणलीय पायेंग यांनी. आज हे जंगल वाघ, गेंडे, गवे, हरिण, हत्ती, माकड, ससे, गिधाडं अनेक प्रकारच्या पक्षी-प्राण्यांचं निवासस्थान झालंय. पस्तीस वर्षे सातत्याने सुरू असलेल्या त्यांच्या या अभूतपूर्व कामगिरीची ही कथाही तेवढीच रोमांचकारी आहे.

मिशिंग जमातीत जन्मलेला पायेंग हा मूळचा आसाममधला जोरहाटचा रहिवासी. ब्रह्मपुत्रा नदीच्या काठावर वसलेलं हे शहर. याच ब्रह्मपुत्रेमध्ये मजुली नावाचं बेट आहे. गेल्या काही वर्षांपासून जादव याच बेटावर राहत आहेत. ब्रह्मपुत्रेला सतत येणाऱ्या पुरामुळे या बेटावरच्या मातीची झीज झाली. वाळू पसरलेली असल्यानं सर्व भाग ओसाड वाळवंट झाला होता.

पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असलेल्या झाडे लावा, झाडे जगवा या कार्याकडे ते 1979 मध्ये वळले. तेव्हा जादव सोळा वर्षांचे होते. जादव यांनी एकर, हेक्टर असा हिशेब न करता केवळ झाडं लावण्याचा ध्यास घेतला आणि 35 वर्षे हे एकच काम करत चौदाशे एकर जमिनीवर एक घनदाट जंगल उभं केलं.

या जंगलाला मोलाई कठोनी किंवा मोला फॉरेस्ट म्हणतात. (आसामी भाषेत कठोनी म्हणजे जंगल. जादव यांना लाडाने मोलाई म्हणतात आणि म्हणून त्यांनी लाडाचं मोलाई हे नाव त्या जंगलाला दिलं आहे.) हे काम करीत असताना त्याला मानाचं, प्रसिद्धीचं, पैशाचं कसलंही भान नव्हतं. जादव यांच्या कार्याची माहिती तब्बल तीस वर्षांनी 2008 साली जगाला झाली. तिही एका योगायोगानंच!

जितू कालिता नावाच्या एका वार्ताहरने प्रांतिक नावाच्या आसामी मासिकात जाधव यांच्यावर प्रदीर्घ लेख लिहिल्यानंतर ते जगासमोर आले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाने 22 एप्रिल 2012 या दिवशी म्हणजे जागतिक वसुंधरादिनी जादव यांचा सत्कार केला व त्यांना फॉरेस्ट मॅन ऑफ इंडियाङ्कहा पुरस्कार दिला. माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनीही जादव यांचा सत्कार केला. पण सर्वात महत्त्वाचं म्हणजे 2015 साली ते पद्मश्री पुरस्काराचे ते मानकरी ठरले.

2012 पर्यंत जादव यांच्या कार्याची माहिती भारतात पसरली होती, परंतु परदेशात त्यांच्या कार्याची माहिती करून देण्याचं काम विल्यम डग्लस मॅकमास्टर या अमेरिकी माणसानं केलं. त्यानं 2013 मध्ये जादव यांच्या कार्यावर एक माहितीपट तयार केला. तिचं नाव फॉरेस्ट मॅन (यू ट्यूबवर हा माहितीपट उपलब्ध आहे.) या माहितीपटाला उत्कृष्ट माहितीपटचा पुरस्कार मिळाला. जंगल उभारणारा हा माणूस मात्र अजूनही आपल्या कुटुंबीयांसमवेत मजुली बेटावरच राहतो.जादव यांच्याकडे पन्नासेक गाई, म्हशी आहेत. त्यामुळे दुग्ध व्यवसायातून येणाऱ्या पैशावर जादव यांचा चरितार्थ चालतो.

त्यांचं लक्ष ब्रह्मपुत्रेतल्या दुसऱ्या बेटाकडे, मेकाहीकडे लागलंय. तिथल्या सहाशे हेक्टर (1500 एकर) जागेवर आता त्यांना जंगल उभं करायचं आहे.सत्य हे कल्पनेपेक्षा विलक्षण असतं या म्हणीप्रमाणे पायेंग हा हाडामासांचा खराखुरा मनुष्य आहे! भारतीय मातीत जन्मलेला आणि वाढलेला अस्सल फॉरेस्ट मॅन! ■ ■

टोयोटा किर्लोस्कर मोटरने प्रतिष्ठा, शक्ती आणि मजबूत क्षमतेचे प्रतीक असलेल्या लँड क्रूझर ३०० च्या बुकिंगची सुरुवात जाहीर केली. ७० वर्षांहून अधिक काळाच्या वारशावर आधारित, लँड क्रूझर ३०० ही टोयोटाच्या अभियांत्रिकी उत्कृष्टतेची अंतिम अभिव्यक्ती आहे, जी लक्झरी शोधणाऱ्या आणि ऑफ-रोड उत्साही लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेली आहे.

तिच्या अतुलनीय विश्वासार्हता, कमांडिंग उपस्थिती आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रसिद्ध, लँड क्रूझर ३०० ही टोयोटाच्या जागतिक श्रेणीतील प्रमुख एसयूव्ही आहे. नवीनतम आवृत्तीमध्ये एक क्रांतिकारी नवीन प्लॅटफॉर्म, प्रगत पॉवरट्रेन, अत्याधुनिक सुरक्षा वैशिष्ट्ये आणि भव्य इंटीरियर्स एकत्रित केले आहेत, जे लक्झरी, ताकद आणि ऑफ-रोड वर्चस्वाचे अखंड मिश्रण सुनिश्चित करते. लँड क्रूझर ३०० दोन वेगवेगळ्या ग्रेडमध्ये उपलब्ध आहे आणि GR-S, ट्विन-टर्बोचार्ज्ड V6 इंजिनद्वारे समर्थित, सुधारित कार्यक्षमता, उच्च टॉर्क आउटपुट आणि वाढीव इंधन अर्थव्यवस्था देते. १०-स्पीड ऑटोमॅटिक ट्रान्समिशनसोबत जोडलेली, ही SUV निर्बाध प्रवेग आणि ऑप्टिमाइज्ड पॉवर डिलिव्हरी देते, ज्यामुळे प्रत्येक ड्राईव्हला एक रोमांचक अनुभव मिळतो. सर्वात कठीण भूप्रदेश हाताळण्यासाठी डिझाइन केलेले, TNGA-F प्लॅटफॉर्मवर शिडी-फ्रेमसह बांधलेले, लँड क्रूझर ३०० ला खूपच हलके, तरीही उत्तम चपळतेसह कडक बनवते. टोयोटाची AWD इंटिग्रेटेड मॅनेजमेंट सिस्टीम बदलत्या रस्त्यांच्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी रिअल टाइममध्ये काम करते, उत्कृष्ट स्थिरता आणि नियंत्रण सुनिश्चित करते. ■ ■



टोयोटा किर्लोस्कर
लँड क्रूझर ३००
बुकिंग सुरु

### साहित्य संमेलन म्हणजे केवळ साजरीकरण राहिले आहे का?

**रंगनाथ नाईकडे, संत साहित्याचे लेखक**

यंदाचे २०२५ चे ९८ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन नुकतेच दिल्लीमध्ये थाटामाटात संपन्न झाले. संपन्न झाले म्हणण्यापेक्षा साजरे झाले असेच म्हणावे लागेल. कारण अलीकडच्या दशकभराचा आढावा घेतला तर हि साहित्य संमेलन अक्षरशः उरकली जातात की काय? असा प्रश्न मला पडतो. खरं तर समाजाला घडविणाऱ्या विविध स्तरातील साहित्यिकांचा हा उत्सव असतो. साहित्यिकांच्या भेटीगाठी होतील, त्यांचे नवीन विचार ऐकायला मिळतील, बाजारात आलेल्या नव्या पुस्तकांची ओळख होईल अशा उद्देशाने ही साहित्य संमेलनाची मागील १०० वर्षांची परंपरा आहे. मात्र हल्ली मान्यवर साहित्यिकांचे मानपान, खर्चिक जेवणावळी, प्रत्यक्ष साहित्य संमेलन स्थळी आयोजनाचा गोंधळ आणि अस्सल साहित्य रसिकांची वानवा या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तर ही संमेलन म्हणजे केवळ दिखावा, भपका आणि साजरीकरण उरलेलं आहे असं मनापासून वाटत.

**शीतल कर्डेकर, सदस्य,मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय**

आजच्या डिजिटल युगात देखील आपल्या साहित्य संमेलनाची मागील शंभर वर्षांची परंपरा आजही टिकून आहे किंबहुना उत्तरोत्तर ती वृद्धिंगत होते आहे याचा तमाम मराठी भाषिकांना अभिमान असायलाच हवा. हत्ती आणि आंधळ्या माणसाच्या गोष्टीप्रमाणे अनेकांना साहित्य संमेलन म्हणजे साजरीकरण वाटत असलं तरी तस अजिबात नाही. या संमेलनाला संपूर्ण देशभरातून असंख्य मराठी वाचक आवर्जून हजेरी लावतातच. शिवाय याच संमेलनात दरवर्षी पुस्तकांची खरेदी लाखोंच्या घरात असते. दरवर्षी नव्या संमेलनाध्यक्षांचे विचार ऐकायला पुस्तकप्रेमी उत्सूक असतात. संमेलनाच्या व्यासपीठावर अनेक नवोदित साहित्यिकांना आपली साहित्य संपदा वाचकांसमोर आणण्याची एक संधी मिळते. कवी संमेलन,विविध विषयावरील परिसांवाद,वाद विवाद अशा गोष्टीमुळे साहित्य संमेलन म्हणजे तमाम वाचकांसाठी एक अविस्मरणीय असा साहित्य उत्सवच असतो.

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## स्मशानभूमीसह ढोरफोडीची जागा समर्थांनी बळकावली?

### पत्रपरिषदेत ग्रामस्थांचा आरोप, कारवाई न झाल्यास आंदोलन करणार

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. २५ :



नजिकच्या खोकरला ग्राम पंचायत हद्दीतील नाल्यावरील स्मशानभूमी आणि ढोरफोडीच्या जागेत दिपक मनोहर समर्थ यांनी अतिकमण करून जागा बळकल्याचा आरोप माजी सरपंचासह ग्रामपंचायत पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी केला आहे. स्मशानभूमीची जागा मोकळी करावी, अशी मागणी संबंधितांनी केली असून, महसुल विभागासह वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

खोकरला येथे साझा क्र. १३, भूमापन क्र. १२१/१/१ मधील ०.५० हेआर जागेचा स्मशानभूमिसाठी आणि ०.१३ हेआर जागेचा ढोरफोडीसाठी निस्तार हक्क देण्यात आला आहे. दोन्ही मिळून ०.६३ हेआर जागा असली तरी ती कमी आढळल्याने तपास केला असता, समर्थ नामक व्यावसायिकाने बरीच जागा बळकवल्याचे दिसून आले.

स्मशानभूमी व ढोरफोडीला लागून असलेली गट क्र.१२१/१/७ क्षेत्रफळ ०.२४ हे.आर. ही जागा सुमनोहर लॉन (मंगलकार्यालय) चे मालक दिपक मनोहर समर्थ यांची आहे. त्यांनी केलेले जुने बांधकाम व सुरू असलेले नवीन बांधकाम ०.२४ हे.आर.पेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास येत असून त्यांनी स्मशानभूमीला लागून असलेल्या नाल्यावर अतिक्रमण केले आहे.

समर्थ यांचे नवीन बांधकाम त्वरित थांबविण्यात यावे व अतिक्रमण केलेली जागा मोकळी करावी, अशी मागणी करीत ग्रामपंचायत आणि गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी यांच्यासह संबंधित विभागाकडे रीतसर तक्रारी केल्या आहेत. समर्थ यांनी शासकीय जागेवर केलेले अतिक्रमण हटविले नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही संबंधितांनी दिला आहे.

पत्रपरिषदेला माजी सरपंच राजू वडे, माजी उपसरपंच रोहीत सार्वे, ओमदेव ठवकर, मारोती सार्वे, सुरेश घोडे, शेषराव फडणीकर, मनोहर धांडे, सोमेश्वर बाभरे, संदीप पटले, महेश लुटे यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

## तब्बल २३ दिवसांनी वाघीण तारेच्या फासातून मुक्त



■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २५ :

जिल्ह्यातील पांढरकवडा वन विभागांतर्गतच्या टिपेश्वर अभयारण्यातील पिसी नामक वाघीणीच्या गळ्यात अडकलेला फास तब्बल २३ दिवसानंतर काढण्यात वनविभागाला यश आले आहे.

१ फेब्रुवारी रोजी अडकलेला तारेचा फास २ फेब्रुवारीला लक्षात आला. नंतर वाघीणीची शोध मोहीम सुरू झाली. तब्बल २३ दिवसांनी म्हणजे काल २४ फेब्रुवारी रोजी सदर वाघीण पाटणबोरी वनक्षेत्रात आढळल्यानंतर सायंकाळी ५.३० वाजता डॉर्ट मारून वाघीणीला बेशुद्ध करण्यात आले आणि तिच्या गळ्यात अडकलेला तारेचा फास काढण्यात आला. जनावरांवर उपचार करणारे वैद्यकीय अधिकारी, वनविभागातील तज्ज्ञांनी ही कारवाई पूर्ण केली.

## अभिनेते संतोष नलावडे यांचे अपघाती निधन

'अप्पी आमची कलेक्टर' मधून ओळख

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ :



टीव्ही मालिका 'अप्पी आमची कलेक्टर' फेम अभिनेते संतोष हणमंत नलावडे यांचे अपघाती निधन झाले आहे. ते ४९ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने शोककळा पसरली आहे.

संतोष नलावडे हे सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात रेकॉर्ड विभागात कार्यरत होते. ते नांदेड येथे विभागीय महसूल क्रीडा स्पर्धेसाठी गेले होते. तिथे त्यांचा अपघात झाला होता. त्यांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर सातारा येथील वाढे या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या रुपाने एक मनमिळावू मित्र हरपल्याची भावना टीव्ही इंडस्ट्रीतून व्यक्त होत आहे.

संतोष नलावडे यांनी साताऱ्यात नुकत्याच झालेल्या विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत यश मिळवले होते. त्यांची राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेसाठी निवड झाली होती. त्यामुळे ते नांदेडला गेले होते. दुचाकीवरून जात असताना त्यांची दुचाकी घसरली. या अपघातात संतोष नलावडे यांच्या डोक्याला गंभीर इजा झाली. उपचारांदरम्यान निधन झाले. संतोष नलावडे यांनी आमची कलेक्टर, शेतकरी नवरा हवा, लाखात एक आमचा दादा, मन झालं बाजींद, कॉन्स्टेबल मंजू, लागीर झालं जी यासारख्या मालिकांतही त्यांनी काम केले होते.